
सिटीझन रिपोर्टर
बनण्याची सुवर्ण संधी
संपर्क करा
०२२ ६९७१ १८९०
dailylokrakshanay@gmail.com



www.lokrakshanay.com · epaper.lokrakshanay.com · dainiklokrakshanay@gmail.com · +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | ■ वर्ष - ०२ ■ अंक १०४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४ ■ रु. २/- | ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118




सिटीझन रिपोर्टर
बनण्याची सुवर्ण संधी
संपर्क करा
०२२ ६९७१ १८९०
dailylokrakshanay@gmail.com


## थोडक्यात



### जागतिक व्यापार अन् १२ लाखांहून अधिक रोजगाराची निर्मिती; मुख्यमंत्र्यांची घोषणा

● पालघर, सुचिता सोनावणे :

पालघर : सिंधुदुर्गातील मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा दुर्घटनेप्रकरणी राज्यात राजकीय वातावरण तापलेलं असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, शुक्रवार (३० ऑगस्ट) यांच्याहस्ते आज पालघरमधील वाढवण बंदराच्या भूमिपूजनासह विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन पार पडले. यावेळी कार्यक्रमाला संबोधित करताना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे भारत जागतिक व्यापारात उतरणार असल्यामुळे १२ लाखांहून अधिक रोजगारांची निर्मिती होईल, अशी घोषणा त्यांनी केला. पान २ वर

### तलाठी हरवला, शोधून देणाऱ्यास ५ हजारांचे बक्षीस



● सोलापूर, नितीन देवळेकर :

गेल्या अनेक दिवसांपासून तलाठी गावात आलाच नाही, किंवा त्याने फोनही सुरू केला नाही म्हणून गावकऱ्यांनी अनोखे आंदोलन केल्याचं सोलापुरात पाहायला मिळालं. माळशिरस तालुक्यातील संगम गावातील युवा सेनेने त्यांची शोधमोहीम सुरू केली. तलाठी गायब असून शोधून देणाऱ्यास पाच हजारांचे बक्षीस देणार असल्याचं जाहीर करण्यात आलं. संगम गावातील या आंदोलनाची जोरदार चर्चा सुरू आहे. नुकत्याच येऊन गेलेल्या पुरामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. अशावेळी पंचनाम्याला तलाठी जागेवर नसल्याने माळशिरस तालुक्यातील संगम गावात युवा सेनेच्या वतीने दवंडी देत तलाठ्याला शोधणाऱ्यास पाच हजाराचे बक्षीस जाहीर केले. संगम गावचे तलाठी हे गेले अनेक दिवसापासून गावातही येत नाहीत आणि फोनही सुरू करत नाहीत. पान २ वर

# भारतात डिजिटल क्रांती; जगातील निम्मे रियल टाईम डिजिटल व्यवहार भारतात होतात - नरेंद्र मोदी

● मुंबई, विशाल कारंडे :




पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शुक्रवार ३० ऑगस्ट रोजी मुंबई, महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये त्यांनी संबोधित केलं. या कार्यक्रमाला रिझर्व बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तीकांत दास सेक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाच्या प्रमुख माधवी पुरी बुच यांच्यासह देशातील सर्वोच्च नियामकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुद्रा योजनेअंतर्गत २७ लाख कोटी रुपयांचे कर्ज - या कार्यक्रमाला संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, दहा वर्षात EU च्या लोकसंख्येइतकी लोकसंख्या आज बँकिंगशी जोडली गेली आहे. आज जगामध्ये निम्मे रियल टाईम डिजिटल व्यवहार हे भारतात होत आहेत. भारताचा UPI आयडी आज जगभरातील फिनटेकचे उदाहरण बनला आहे. गाव असो वा शहर, हिवाळा असो किंवा उन्हाळा, भारतात बँकिंग सेवा २४ तास, सात दिवस, बारा महिने अहोरात्र सुरू आहे. जनधन योजनेअंतर्गत महिलांची २९ कोटींहून अधिक बँक खाती उघडण्यात आली आहेत. या खात्यांमुळे महिलांसाठी बचत आणि गुंतवणूक करण्याच्या नवनवीन संधी निर्माण झाल्या आहेत. या खात्यांच्या माध्यमातून मुद्रा योजना सुरू करण्यात आली आहे. मुद्रा योजनेअंतर्गत आतापर्यंत २७ लाख कोटी रुपयांचं कर्ज वितरित करण्यात आलं असून या योजनेच्या ७० टक्के लाभार्थी महिला आहेत, असंही मोदी म्हणाले.

फिनटेकमुळे आर्थिक सेवांचे लोकशाहीकरण - पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढं म्हणाले की, एकेकाळी बँका या फक्त एका इमारतीपुरत्याच मर्यादित होत्या. परंतु आज बँका या प्रत्येक भारतीयाच्या मोबाईलमध्ये आल्या आहेत. याचं कारण फिनटेक आहे. कारण फिनटेक मुळेच हे घडलं आहे. फिनटेकमुळे आर्थिक सेवांचं लोकशाहीकरण झालं आहे. लोक विमा तसंच क्रेडिट सुविधांचा लाभसुद्धा घेत आहेत. भारतामधील फिनटेक इकोसिस्टीम भारतातील लोकांना दर्जेदार जीवनशैली देण्यावर भर देत आहे. यातूनही अजून आपले सर्वोत्तम येणे बाकी आहे. याचा अर्थ असा आहे की, आपली सर्वात मोठी क्षमता अजून समोर येणे बाकी आहे.

५३ कोटींहून अधिक जनधन बँक खाती - मोदी पुढे म्हणाले की, AI (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) च्या गैरवापराशी संबंधित चिंता फार मोठी आहे. याकरता भारताने AI च्या नैतिक वापरासाठी जागतिक स्तरावर फ्रेमवर्क तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. फिनटेक क्षेत्राला सरकार मदत करत असून त्याकरता आम्ही काही करही काढले आहेत. संशोधन आणि नवनिर्मितला चालना देण्यासाठी आम्ही १ लाख कोटी रुपयांचा निधी तयार करण्याचा निर्णयसुद्धा घेतला आहे. पान २ वर

## शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मागितली जाहीर माफी

● पालघर, सुचिता सोनावणे :



मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. या घटनेनंतर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करण्यात येत आहे. यावरून विविध राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत. दरम्यान आता पंतप्रधान मोदी यांनीही यासंदर्भात भाष्य केलं आहे. पंतप्रधान मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर असून त्यांनी आज वाढवण बंदराचे भूमिपूजन केलं. यावेळी बोलताना त्यांनी सिंधुदुर्गयेथील घटनेवरही प्रतिक्रिया दिली. काही दिवसांपूर्वी सिंधुदुर्गमध्ये जे काही घडलं, ते अत्यंत दुख:द आहे. शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही, तर ते आमचे आराध्य दैवत आहेत. मी आज नतमस्तक होऊन त्यांची माफी मागतो. तसेच जे लोक छत्रपती शिवाजी महाराजांना आराध्य मानतात, या घटनेमुळे त्यांच्या मनालाही जे वेदना झाल्या आहेत. पान २ वर

## राज्यातील १४०० लोकांना व्हायचंय काँग्रेसमधून आमदार, विधानसभेसाठी पक्षाला 'अच्छे दिन'

● मुंबई, यश सावंत :



लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेसला पुन्हा एकदा अच्छे दिन आल्याचं दिसून येतंय. कारण लोकसभेतील घवघवीत यशानंतर आता विधानसभेसाठीही काँग्रेसमधून इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचं दिसतंय. विधानसभेतील २८८ जागांसाठी काँग्रेसकडे तब्बल १४०० हून अधिक इच्छुकांचा अर्ज आला आहे. त्यामध्ये मराठवाडा आणि विदर्भातील इच्छुकांची संख्या मोठी आहे. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने १७ जागा लढवल्या आणि त्यातील १३ जागांवर विजय मिळवला. त्यामुळे काँग्रेस नेत्यांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढल्याचं दिसतंय. काँग्रेसने अंतर्गत सर्व्हे केला असून त्यामध्ये पक्षाला विधानसभेत ८० ते ८५ जागा मिळतील आणि काँग्रेस राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल असं सांगण्यात आलं. पान २ वर

## सिंधुदुर्गातील शिवाजी महाराजांचा पुतळा पडला की पाडला?

### प्रकाश आंबेडकरांची खळबळजनक शंका



● अकोला, सचिन कदम :

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासंदर्भात वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अतिशय मोठं आणि धक्कादायक विधान केलंय. पुतळा कितीही कमजोर असला तरी पडू शकत नाहीय. त्यामुळे मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला की पाडला गेलाय? असा संशय प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केलाय.

प्रकाश आंबेडकरांच्या या दाव्यानंतर मोठा गदारोळ होण्याची शक्यता आहेय. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी ही प्रकाश आंबेडकर यांनी केलीये. तर या मुद्द्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जनतेची माफी का मागत नाही?, याचाही खुलासा करण्याचं प्रकाश आंबेडकर म्हणालेत. दरम्यान, तिसऱ्या आघाडी संदर्भात १० सप्टेंबरला बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असं ते म्हणाले. ते अकोला येथे बोलत होते. पान २ वर

## "सीएम शिंदेंना शिवरायांप्रती आत्मियता असेल तर ४ प्रश्नांची उत्तरे देतील - ठाकरे गटाचे आव्हान

● मुंबई, विशाल पाटील :



मुंबई : सिंधुदुर्गच्या मालवण तालुक्यातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. यानंतर या मुद्द्यावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळत आहे. राजकीय नेते राजकोट किल्ल्यावर जाऊन पाहणी करत आहेत. तर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल सुरूच ठेवला आहे. यातच आता पुन्हा एकदा ठाकरे गटाने या मुद्द्यावरून महायुतीवर टीका करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना काही प्रश्नांची उत्तरे देण्याचे आव्हान दिले आहे.

राजकोट येथे ठाकरे गट आणि भाजपा राणे समर्थकांमध्ये जोरदार राडा झाल्यानंतर या प्रकरणी अनेकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी माफी मागितली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनीही याबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे. यातच आता ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना काही प्रश्न केले आहेत.

आम्ही राजकोट किल्ल्यावर गेलो, म्हणून मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रकरणात एक समिती नेमली. हा विषय महाराष्ट्राच्या आत्म्याशी जोडलेला असल्याने काही विषय मांडतो आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवरायांप्रती आत्मीयता बाळगून असतील तर यावर उत्तर देतील. पान २ वर

# जिल्ह्यातील गणेशोत्सवाचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

■ गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांनी दक्ष राहावे
■ पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा -पालकमंत्री शंभूराज देसाई



● ठाणे, रोहित जैसवार :

ठाणे जिल्ह्यात लागोपाठ येणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुका व ईद-ए-मिलादच्या मिरवणुका शांततेत संपन्न व्हाव्यात, यासाठी पोलीस, महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाने दक्ष राहण्याच्या सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज येथे दिल्या तर नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक व ईद-ए-मिलाद च्या मिरवणुकीसंदर्भात जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हा प्रशासन, पोलीस व महानगरपालिका प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी आमदार गीता जैन, राजू पाटील, शांताराम मोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहआयुक्त डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ. डी.एस.स्वामी, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ.इंदूराणी जाखड, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त विकास ढाकणे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, ठाणे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, तिरूपती काकडे, रश्मी नांदेडकर, मीना मकवाना, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, तहसिलदार डॉ.आसावरी संसारे, रेवण लेंबे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री महोदयांनी जिल्ह्यातील पोलीस बंदोबस्त, मनुष्यबळाची उपलब्धता, कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात केलेल्या उपाययोजना, विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, विसर्जनस्थळाच्या सुविधा याबद्दल सर्व पोलीस आयुक्तालये व महापालिकांकडून सविस्तर माहिती घेतली.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पालकमंत्री श्री.देसाई म्हणाले की, महानगरपालिका व नगरपरिषद हद्दीतील रस्त्याचे खड्डे १०० टक्के भरण्यात यावे. पाऊस कमी झाला आहे, नालेसफाई तात्काळ करुन घ्यावी. नाले जर अगोदर तुंबले असतील तर पाणी रस्त्यावर येते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. यासाठी आवश्यक तेथे नाल्यांची स्वच्छता करून घ्यावी. 24 तास विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी. विद्युत विभागाने दुरूस्तीची कामे तात्काळ पूर्ण करुन घ्यावीत.

ते पुढे म्हणाले की, मोठ्या गणेशोत्सवामध्ये गर्दीच्या ठिकाणी पुरेसा बंदोबस्त ठेवावा. महिलांची छेडछाड होणार नाही याची दक्षता घ्यावी. श्रींच्या आगमनाच्या व विसर्जनाच्या मिरवणूकीच्या वेळी वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मिरवणूका शांततेत पार पडायला हव्यात. विसर्जनाच्या ठिकाणी वॉर्ड अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. कृत्रिम तलावामध्ये पुरेसा पाणीसाठा ठेवावा. जेणेकरुन मूर्ती विसर्जन व्यवस्थित होईल, मूर्तीची विटंबना होणार नाही याची पूरेपूर काळजी घ्यावी.

पोलिसांनी गस्तीचे प्रमाण वाढवावे. गणेशोत्सव काळात एकही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी घ्यावी. लेझर लाईटचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, त्यामुळे या लेझर लाईटबाबत आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. विसर्जनाच्या मिरवणूकीमध्ये आवाजाची मर्यादा मोडली जाते, प्रकृतीला इजा होईल अशा प्रकारे आवाजाचा डेसिबल वाढू नये, याची दक्षता घ्यावी, असे सांगून उत्सवात कोणतीही आडकाठी आणू नये. सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, याची सर्वोतोपरी काळजी घ्यावी. महिला, बालके यांच्यासह सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व खबरदारी पोलीस विभागाने घ्यावी, असेही श्री.देसाई यांनी यावेळी सांगितले. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्सव कालावधीत मांस विक्रीबाबतचा निर्णय स्थानिक पक्षांचे पदाधिकारी व सामाजिक संघटना यांनी एकत्रित समन्वयाने घ्यावा. याचे नियोजन व नियंत्रण मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्तांनी करावे, अशा सूचना श्री.देसाई यांनी यावेळी दिल्या.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी पालकमंत्र्यांना सांगितले की, गणेशोत्सवासंदर्भात ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका आयुक्त व सर्व यंत्रणांची बैठक घेवून सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# संपादकीय


## सरकारवर टीका म्हणजे नक्षलवाद नव्हे!

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची २४ ऑगस्ट २४ रोजी छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे नक्षलग्रस्त सात राज्यांतील अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, ओदिशा, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, 'नक्षलवादविरोधी लढाई अंतिम टप्प्यात असून मार्च २०२६ अखेर देशातून नक्षलवाद्यांच्या नायनाट केला जाईल. नक्षलवादाची समस्या गंभीर आहे. त्यामुळे नक्षलवाद संपविण्यासाठी कठोर कारवाई केली जाईल. लोकशाहीला नक्षलवाद्यांचा मोठा धोका आहे. गेल्या चार वर्षांत नक्षलवाद्यांमुळे १७ हजारांहून अधिक लोकांचा बळी गेला आहे. त्यामुळे त्यांचा बीमोड करण्यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले टाकण्यास सुरुवात केली आहे.' नक्षलवादाचा बीमोड हा खरंच अतिशय महत्त्वाचा गंभीर विषय आहे. केंद्रीय गृहमंत्री आगामी दीड वर्षात त्याचा बिमोड करू असे म्हणतात हे स्वागतार्ह आहे. मात्र त्यासाठी | नक्षलवादाचा इतिहास लक्षात घेऊन त्याचे योग्य प्रकारे निर्दालन करण्यासाठी फार कठोर पावले उचलावी लागतील आणि योग्य प्रकारे नियोजनही करावे लागेल.

नक्षलवाद्यांचे हल्ले आणि त्यातून होणारी मोठी हानी हा गेल्या अनेक दशकांपासून चिंतेचा विषय आहे. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अनेक जवान, नेते, सर्वसामान्य नागरिक बळी गेले आहेत. मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी प्रमाणेच वित्तहानीही झाली आहे. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना केंद्र सरकारने ६ जून २००९ रोजी नक्षलवादविरोधी धोरणाचा १४ कलमी मसुदाही तयार केला होता. पणअंमलबजावणीच्या दृष्टीने तो तकलादू ठरला. गेल्या दहा वर्षांत विद्यमान केंद्र सरकारनेही फार मोठे यश मिळवले आहे असे दिसत नाही.

नक्षलवादाबाबतचा सरकारी दृष्टिकोन अभ्यासपूर्ण नाही हे आजवर वारंवार स्पष्ट झाले आहे. अनेकदा तर परिवर्तनवादी पुरोगामी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचीही नावे चक्क नक्षलवाद्यांच्या यादीत समाविष्ट झाल्याचे दिसून आले होते. मानवतावादी संघटना नक्षलवाद विरोधाची धार बोथट करतात असाही आरोप काही राजकारण्यांनी केला. अर्थात अलीकडे सामाजिक, परिवर्तनवादी संस्था संघटनांमध्ये सक्रिय राहून शहरी भागातही आपले बस्तान बसवायचे नक्षलवाद्यांचे प्रयत्न नाकारता येत नाहीत. हे खरे असले तरी नक्षलवादी कुणाला म्हणायचे याबाबत सरकारी यंत्रणा संभ्रमात आहे, हे वारंवार दिसून आले आहे. शासनाच्या धोरणांवर टीका करणारा, डावा पुरोगामी विचार मांडणारा, सर्वांगीण विषमता नष्ट झाली पाहिजे असे म्हणणारा जो कोणी असेल तो नक्षलवादी आहे असे जर शासन मानणार असेल तर बहुसंख्य जनतेलाच नक्षलवादी म्हणावे लागेल. नक्षलवाद हा घटनाविरोधी आहे. देशाला त्यापासून धोका आहे. त्याचा बीमोड झालाच पाहिजे यात शंका नाही. पण त्यासाठी नक्षलवाद म्हणजे नेमके काय हे समजूनही घेतले पाहिजे...

१९६७ साली दार्जीलिंग जिल्ह्यातील नक्षलबाडी या गावी माओवाद्यांनी सशस्त्र उठाव करण्याचा प्रयत्न केला. असा उठाव देशात इतरही काही ठिकाणी झाला. पण पहिला उठाव नक्षलबाडी या गावी झाला म्हणून या चळवळीला नक्षलवादी चळवळ हे नाव पडले. चीन व रशिया यांच्यातील वाद १९६३ साली विकोपाला गेला. परिणामी आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत फूट पडली. १९६४ साली भारतातही कम्युनिस्ट चळवळीत आणि पक्षात फूट पडली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट असे दोन पक्ष स्वतंत्र झाले. भारताच्या सरकारचे वर्गस्वरूप नेमके कोणते यावर मुख्य मतभेद झाले. त्यावर लोकशाही क्रांतीचा मार्ग चोखाळण्यात भारताच्या वास्तवाच्या संदर्भातील रणनीती त्यांनी ठरवली. त्यामध्ये मार्क्सवादी पक्ष डावीकडे झुकलेला असल्याने अतिडाव्या विचारांच्या नक्षलवाद्यांनी त्यात सहभाग दाखवला. परंतु त्यांची भूमिका न पटल्याने नक्षलवाद्यांनी त्यातून बाहेर पडून स्वतःची वेगळी रणनीती तयार केली. त्यातून नक्षलवाद्यांच्या अमानूष कारवाया सुरू झाल्या. व्यवस्था बदलायचे नाव घेत अराजक निर्माण करण्याचे काम त्यांनी हिंसेच्या माध्यमातून सुरू केले.



### आजची चित्रोळी

जलौघ मृदु धरेस कापून
उताराकडे धांवत जातो !
धरतीवर मग खड्डा वाढून
हळूहळूं धबधबा बनतो !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### भारतात डिजिटल क्रांती; जगातील निम्मे...

तसंच सायबर फसवणूक थांबवण्यासाठी आणि डिजिटल साक्षरतेला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यासाठी मोठी पावले उचलावी लागणार आहेत. त्यासोबत फिनटेकसाठी सायबर फसवणूक अडथळा तर ठरणार नाही ना, याची काळजीसुद्धा घेणे आवश्यक आहे. भारतात १८ वर्षावरील क्वचित कोणी असेल ज्याची डिजिटल ओळख म्हणून आधार कार्ड नसेल. फक्त एका दशकात भारतातील ब्रॉडबँड वापरकर्त्यांची संख्या ही ६ कोटीवरून ९४ कोटी झाली आहे. आज ५३ कोटींहून अधिक लोकांची जनधन बँक खाती उघडली गेली आहेत. याचा अर्थ १० वर्षात आम्ही संपूर्ण युरोपियन युनियन इतकी लोकसंख्या बँकिंग प्रणालीशी जोडली गेली आहे.

### शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी पंतप्रधान...

मी त्यांच्यापुढेही नतमस्तक होऊन त्यांची माफी मागतो, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी विरोधकांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिलं. आमचे संस्कार वेगळे आहेत. त्या लोकांसारखे नाहीत, जे महाराष्ट्राचे सुपूत्र असलेल्या वीर सावरकरांना शिव्या देतात. विरोधकांनी अनेकदा सावरकरांना अपमानित केलं आहे. तसेच देशभक्तीच्या भावनेला पायदळी तुडवलं आहे. मात्र, त्यांनी कधीही वीर सावरकर यांची माफी मागितलेली नाही, विरोधकांचे संस्कार आता महाराष्ट्रातल्या जनतेला माहिती झाले आहेत. हे आमचे संस्कार आहे. मी महाराष्ट्राच्या भूमीत येऊन सर्वात आधी छत्रपती शिवरायांची माफी मागितली आहे, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

### राज्यातील १४०० लोकांना व्हायचंय काँग्रेसमधून...

त्यामुळे काँग्रेसने सर्व जागांवरील इच्छुकांचे अर्ज मागितले होते. त्यासाठी आता १४००हून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत.

विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये गेल्या काही काळापासून भाजपची मजबूत पकड होती. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने या भागात जोरदार मुसंडी मारल्याचं दिसून आलं.

दहा वर्षांनंतर काँग्रेसचे कमबॅक

२०१४ नंतर भाजप महाराष्ट्र विधानसभेत हळूहळू मजबूत पक्ष बनला. तर त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या जागा कमी होत गेल्या. २०१४ मध्ये काँग्रेसने ४२ जागा जिंकल्या होत्या, तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने ४४ जागा जिंकल्या होत्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील निकालाच्या आकडेवारीनंतर २८८ मतदारसंघांपैकी ९० विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस आघाडीवर आहे. २०१९ मध्ये काँग्रेस पक्षाकडे केवळ ४७६ अर्ज आले होते, परंतु आता ही संख्या तिप्पट झाली आहे.

काँग्रेसचे मिशन २०२४ काँग्रेसने नुकतेच २८८ विधानसभा मतदारसंघांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, MVA बैठकीत काँग्रेसने १३५ जागांवर निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. मुंबईतील ३६ पैकी २२ जागांवर शिवसेना ठाकरे गट इच्छुक आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ५-७ जागांवर लक्ष केंद्रित करत आहे. मुस्लीम आणि दलित मतांमुळे काँग्रेसने मुंबईत जास्त जागांवर लक्ष्य ठेवले आहे. त्यामुळे मुंबई, मराठवाडा आणि विदर्भात जास्त जागा जिंकल्या तर काँग्रेसची सत्ता येण्याची शक्यता जास्त आहे. ज्याच्याकडे जास्त जागा असतील तो मुख्यमंत्रिपदाचा दावेदार असेल.

### सिंधुदुर्गातील शिवाजी महाराजांचा पुतळा पडला...

संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा- प्रकाश आंबेडकर

सिंधुदुर्गातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका संदर्भात अनेक वक्तव्य पुढे आले आहेत. परंतु धातूचा पुतळा हा कितीही कमजोर असला तरीही तो पडू शकत नाही. जुन्या काळात देखील बाबासाहेबांचा, महात्मा फूले किंवा इतर महापुरुषांचे पुतळे असतील ते गावागावत बसवले गेलेत. त्यावेळी ते नुसते चबुतऱ्यावर बसवले गेलेत. मात्र ते कधी पडल्याची घटना घडली नाही. पुतळे विद्रूप करण्याच्या, विटंबना करण्याच्या बातम्या आजवर आल्या आहेत. मात्र पुतळा पडल्याच्या बातम्या माझ्या तरी बघण्यात अथवा ऐकण्यात नाही. त्यामुळे मला असा संशय येतो आहे की हा पुतळा पडला की पाडला?

कारण राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती बघता ती कधी या बाजूला तर कधी त्या बाजूला आहे. त्यामुळे जनतेचे लक्ष विचलित करण्याचे काम तर यात केल्या गेल्या नाही ना? अशा संशयाला जागा आहे. त्यामुळे या पुतळा पडला की पाडला याची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

स्ट्रक्टरल कन्सल्टंट चेतन पाटीलला मध्यरात्री कोल्हापुरातून उचललं

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला बांधकाम सल्लागार (स्ट्रक्चरल कन्सल्टंट) चेतन पाटील याला पोलिसांनी गुरुवारी मध्यरात्री कोल्हापूरमधून ताब्यात घेतले. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने ताब्यात घेतल्यानंतर त्याला मालवण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते. त्यानंतर चेतन पाटील याला पुढील चौकशीसाठी मालवणात नेण्यात आले. पोलिसांचे पथक त्याला घेऊन तातडीने मालवणच्या दिशेने रवाना झाले होते. चेतन पाटीलला मालवण पोलीस स्थानकात आणण्यात आले असून दुपारी साडेतीन वाजता मालवण दिवाणी न्यायालयात दाखल केले जाणार आहे. या सुनावणीत काय घडणार, हे पाहावे लागेल.

### "सीएम शिंदेंना शिवरायांप्रती आत्मियता असेल...

वास्तूविशारद आणि शिल्पकार या दोन भिन्न गोष्टी आहेत. ज्या लोकांचे नाव या समितीमध्ये घेतले आहे, त्या लोकांनी कधी साधा मातीचा गणपती तरी हाताने बनवला आहे का? ते पडलेल्या शिल्पाचा अभ्यास करण्यास पात्र आहेत का? किती उंचीचा पुतळा येथे उभारायचा, याचा शास्त्रीय अभ्यास झाला होता का? खालील बेटाची ताकद जोखून हा पडलेला पुतळा उभा झाला होता का? की कोणाची तरी राजकीय महत्वाकांक्षा म्हणून मनाने उंचीचा आकडा सांगितला गेला? राजकोटवर आजघडीला उपलब्ध बांधकाम सामुग्री वापरून उभारण्यात आलेली लाल भडक तटबंदी किल्ल्याच्या मूळ अवशेषांचे वाटोळे करून उभारली गेली का? विद्यमान सदस्यांच्या प्रेमापोटी काही विद्वान माणसे मुद्दाम बाजूला ठेवण्यात आली आहेत का? असे प्रश्न विचारण्यात आले आहेत.

दरम्यान, राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर राज्यात संताप व्यक्त करण्यात येत आहे. हा पुतळा आम्ही पाहिला होता. बांधकाम बघितले होते ते काही चांगल्या गुणवत्तेचे नव्हते हाच महाराजांचा अपमान आहे. मात्र हा पुतळा का पडला, त्यामागची कारणे काय हे बाजूला पडले आणि त्यात राजकारण सुरू झाले, अशा भावना मालवणमधील स्थानिकांनी व्यक्त करण्यात आल्या आहेत.

### जागतिक व्यापार अन् १२ लाखांहून अधिक...

एकनाथ शिंदे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भरभरून कौतुक केले. ते म्हणाले की, आजचा दिवस सोनेरी अक्षरात लिहिला जाईल. वाढवण बंदर हा गेमचेंजर प्रकल्प आहे. याचा फायदा महाराष्ट्राला होईलच, पण देशालाही होणार आहे. पण पालघरच्या जनतेला सर्वाधिक फायदा होणार आहे. मोदींच्या हातात सफलतेचं पारस आहे. त्यामुळे मोदींच्या हस्तेच या बंदराचं भूमीपूजन व्हायचं असेल. २०२९ मध्ये या बंदराचं बांधकाम पूर्ण होईल आणि मोदींच्याच हस्ते या बंदराचं उद्घाटन आम्ही करणार आहोत. या बंदरासाठी ७६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून हे देशातील सर्वात मोठं बंदर असणार आहे, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी यावेळी केला.

### तलाठी हरवला, शोधून देणाऱ्यास ५ हजारांचे बक्षीस

त्यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना तलाठी कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत. तलाठी ऑफिसमध्ये येत नसल्याने शेतकऱ्यांची कामे खोळंबलेली आहेत. म्हणून अखेर आज युवा सेनेच्या वतीने शासनाला जग आणण्यासाठी तलाठी शोधून देणाऱ्यास 5 हजार रुपयाचे बक्षीसही जाहीर केले आहे . महसूल विभागाने तलाठीवर तात्कारळ कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली आहे. शिंदे-फडवणीस-पवार सरकारचा या आधिकाऱ्यांवर कसलाही वचक राहिलेला नाही असाही आरोप युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांनी केला आहे.

# ईडा पिडा घेऊन जाऽऽ गे मारबत'

पोळयाच्या पाडव्या दिनी 'मारबतीची' परंपरा व ऐतिहासिक मिरवणूक नागपूर नगरीचा ठेवा ! ही मिरवणूक तर नागपूरची आन, बान आणि शान आहे, हा उत्सव त्या मागचा उद्देश !

काळी व पिवळी मारबत असे दोन प्रकार आहेत. चार दिवस तिची विधिवत स्थापना केली जाते. लहान मोठे सांस्कृतिक कार्यक्रम या निमित्ताने होतात. महाप्रसादाचे आयोजन केले जाते आणि तान्ह्या पोळयाच्या दिवशी यांची मिरवणूक काढली जाते. आणि दहन केले जाते. लहान मोठे सगळेजण मिरवणूक मार्गाच्या दुतर्फा उभे राहून मारबत व बडग्या बघतात. या दिवशी नागपूर व जवळपासच्या गाव-खेडयातील लोकं नागपूरला आपल्या लहानग्यांना घेउन येतात. आज या शेकडो वर्षांच्या परंपरेला टिकवून नागपूरची ओळख आणि वेगळेपण हे औचित्य साध्य झाल्यामुळे आजही टिकून आहे. ऐतिहासिक सोहळा नागपूर नगरीचा ठेवा अनेकांना कळावा यासाठी हा लेखन प्रपंच !

पूर्वी मारबत महोत्सव थोडा बिभत्सेकडे झुकलेला होता. त्यामुळे मारबत मिरवणुकीत जाणे हीन अभिरुचीचे मानले जायचे. पण आता परिस्थिती बदलली आहे. भारतातला हा एकमेव उत्सव नागपूर शहरात संपन्न होत असतो, त्या मागे उदात्त हेतू आहे. 'हे लक्षात आल्याने आता मारबत मिरवणुकीतील असभ्यता बऱ्यापैकी कमी झालेली आहे. कित्येक भाविक स्वतःच्या समस्या दूर व्हाव्यात म्हणून मारबतीला नवस बोलतात. वर्षानुवर्षे प्रचंड उत्साहात हा सोहळा साजरा होतो, होत राहील. तेव्हा या मारबत सोहळयात सहभागी होऊ आणि म्हणूयात -

मना मनातली अस्वस्थता,
हेवेदावे, भीती, रोगराई
घेऊन जाऽऽ गे मारबत

"सगळे अशुभ, अमंगळ घेऊन जाऽऽ गे मारबतऽऽऽ!" या आरोळयांनी दरवर्षी 'तान्ह्या पोळया' च्या दिवशी नागपूरातील महाल इतवारी भाग - दुमदुमुन गेलेला असतो. मारबत हा सोहळा संपूर्ण भारतात फक्त नागपुरातच भव्य दिव्य स्वरुपात साजरा होतो. मारबतही नागपूरकरांची अशी ग्रामदेवता आहे की ती या गावावर येणारी सगळी संकटे, आपल्या सोबत दूर घेऊन जाते आणि विसर्जित होते.



काळी मारबत 138 वर्षांपासून चालू आहे. या काळया मारबतीचा संबंध महाभारतकाळाशीही जोडल्या जातो. पुतना मावशीचे रूप धारण करून भगवान कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला आणि कृष्णाच्या हातून तिचा मृत्यू झाल्यावर गावकऱ्यांनी तिची धिंड अर्थात मारबत काढली आणि गावाबाहेर तिला जाळले. यामुळे गावावर पुन्हा कधीही समस्या, संकटे आली नाहीत, अशी आख्यायिका आहे. याच संदर्भाने नागपुरातही काळी-पिवळी मारबत काढण्यात येते. या मारबतींना शहराच्या बाहेर जाळल्याने शहरातील कुरीती आणि संकटे संपतात, अशी मान्यता आहे.

जन्माष्टमी नंतर सणवार एकमेकांच्या हाता हात गुंफुन येतात पिठोरी अमास्येनंतर भाद्रपदात गौरी-गणपतीचे आगमन होते. खरंतर विचाऱ्या अमावस्येला सर्वजणच आळतात त्यादिवशी मुहूर्त, नवीन खरेदी, गोडधोड काही नसतं. अपवाद फक्त दोनच. एक श्रावणी अमावस्या आणि दुसरी लक्ष्मीपूजनाची आश्विन अमावस्या बैलपोळयाची दर्शग पिठोरी अमावस्या म्हणजे श्रावण आणि भाद्रपदामधला संधिकाल. बैलपोळयापासुन अनंत चतुर्दशीपर्यंत काही सण एकमेकांना बिलगुन उभे आहेत. त्यांच्यातला एक समान दुवा म्हणजे गल्ली-बोळींमधुन अत्यंत उत्साहाने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका, बैलपोळयाला सजवलेल्या बैलांची वाजत-गाजत मिरवणूक निघते तर दुसऱ्या दिवशी तान्ह्या पोळयाला कालीपिलीची मारबत निघते. अनंत चतुर्दशीला पुन्हा ढोलताशा वाजतो आणि एरवी सुस्तावलेली गल्लीबोळ त्यावर बेभान थिरकू लागते. मूळात मारबत ही प्रथा मध्यप्रदेशातील काही आदिवासी जमातीत दिवाळीच्या रात्री पाळली जाते. विशिष्ट आकारातली मातीची मूर्ती इडा पीडा, अमंगलतेचे प्रतिक म्हणून गावाबाहेर ढकलत नेतात. पण मग ही प्रथा खूप वेगळया स्वरूपात नागपुरात कशी रुजली? यामागचा इतिहास असा की, महाराणी बाकाबाई भोसले या नागपूर भोसल्यांच्या राणीने इंग्रजांशी तथाकथित हातमिळवणी केली. त्यामुळे नागपूरचे समाजमानस क्षुब्ध झाले. या घडल्या घटनेचा मोठ्या प्रमाणावर निषेध करण्यासाठी बाकाबाईला स्वार्थी, देशद्रोही ठरवून त्यांचे प्रतिक म्हणून "काळया मारबती" चा जन्म झाला. तसेच त्यांचे पती रघुजीराजे भोसले (दुसरे) यांनी त्यांना रोखले नाही म्हणून त्यांचे प्रतिक बडग्याच्या रूपाने अवतरले. पुढे इंग्रजांना नामोहरम करण्यासाठी कर्तबगार बाकाबाई भोसल्यांची ती रणनीती होती हे सिद्ध झाले. पण सुरू झालेली प्रथा बंद पाडणे नागपूरकरांना शक्य झाले नाही. मग मारबत ही दुष्टता, अमंगळ रूढी यांचे वहन करून स्वतः सोबत घेऊन जाणारी देवता म्हणून जनमानसात रुजली आणि आता वर्षानुवर्षे ही प्रथा पाळली जाते. तर, विविध सामाजिक समस्या, अनिष्ट रूढी, परंपरा यांचं प्रतिक म्हणून विविध पिवळी मारबत निघते. काळया मारबतीला पुतना मावशीचं रूप मानलं जातं. म्हणूनच तिच्या स्तनांमधून दुग्धधारा पाझरतात. अनंत चतुर्थीच्या अगोदर भागवत एकादशीला वामन जयंती असते. हे सर्व दिवस प्राचीन संस्कृतीच्या अद्भुत धाग्याने गुंफलेले आहेत. बाळकृष्ण आणि पुतना मावशीची गोष्ट विष्णुपुराण, भागवत पुराण, हरिवंश, ब्रह्मपुराण, अग्निपुराण, पद्मपुराण आणि ब्रम्हवैवर्त पुराणामध्ये थोडयाफार फरकाने दिली आहे. सर्वच पुराणांमध्ये आहे की, कंसाने पुतनेला बाळकृष्णाला मारण्यासाठी पाठविले. हरवंश आणि पद्मपुराणामध्ये ती रात्री येऊन लहान मुलांना मारते. काळया मारबतीने हाच रात्रीचा रंग ल्येवलेला आहे. भागवत आणि ब्रम्हवैवर्त पुराणानुसार पुतनेच्या मनीचा भाव कसाही असा. श्रीकृष्णाच्या स्पर्शाने तिला मोक्ष प्राप्त झाला. बाळकृष्णाने मारल्यावर गावकऱ्यांनी तिच्या अंगाचे लचके तोडून तिला जाळले. पण त्या धुरातून दिव्य सुगंध येऊ लागला ती मुक्तात्मा झाली, म्हणुन तिचे महत्व. "वैदिक व नंतरच्या काळात बरेचदा वामनाचा उल्लेख आलेला आहे. बुटक्या आणि खुज्या माणसांच्या कथांमध्ये बुटका केवळ ठेंगणा नसतो तर त्यात असाधारण अशी दैवी शक्ती दिसते. 'हिमगौरी आणि सात बुटके' ही कथा प्रत्येकाने वाचली असेलच. बलीराजाला पाताळात गाडण्यासाठी विष्णूने वामनाचे रूप घेतले तसेच दुसऱ्याही एका कथेत धुंधु राक्षसाचा वामनाचे रूप घेऊन त्याने पराभव केला आहे. कश्यप आणि दनु यांचा मुलगा धुंधु स्वर्गप्राप्ती होण्यासाठी अश्वमेध यज्ञ करतो आणि देव घाबरून विष्णूकडे मदतीसाठी धावतात. त्यामुळे वामनाचे रूप घेऊन विष्णू धुंधुकडे आला आणि आल्यावर देविका नदीच्या पात्रात स्वतःला झोकून दिले. यज्ञ सोडून सर्वजण त्याला वाचविण्यासाठी गेले तेव्हा तो म्हणाला की, "निर्धन असा मी वर्षभरापासून गटांगळया खात आहे." धुंधुने त्याला वर मागण्यास सांगितले, तेव्हा वामन म्हणाला, "मी बुटका, काय मागणार! मला माझ्या तीन पावलांएवढ्या लांबीची भूमी दे." धुंधुने मान्य केल्यावर वामनाने दोन पावलातच सबंध विश्व व्यापून टाकले आणि तिसरे पाऊल ठेवले ते धुंधु राक्षसाच्या पाठीवरच ! श्रावणी अमावास्येला बैलपोळा सजतो. घरोघरी पुरणपोळीचा गोडसर खमंग वास येत असतो. खांदेमळणी करून सायंकाळी बैलांच्या खांद्याला हुरमुज मळला जातो. बैलाच्या शिंगाला रंग लावून बेगड चिटकवायचे. नवीन दावन, पेंडी, गळयात कडे, नव्या वेसणी, म्होरक्या घालून अंगावर रंगांचे ठिपके, शिंगाला शेंब्या गोंडे, पायात वाळे, झुली, बाशिंग, चाळ घालून सजवलेल्या सर्जाची गावात वाजत-गाजत मिरवणूक निघते. घरी आल्यावर ओवाळून नैवेद्य दाखवून पुरणपोळी खाऊ घालायची. दुसरे दिवशी नदी-ओढ्यात 'घेऊन पोहणी करायची.

तान्ह्या पोळयाला भल्या पहाटे उठून आमच्या लाकडी बैलांची डागडुजी आम्ही करून ठेवायचो. कारण सकाळी 10 वाजेपासूनच मारबती सुरू व्हायच्या. आई तहान लाडू, भूक लाडू डब्यात बांधून द्यायची. उड्या मारतच नेहरू चौकात जाऊन मोक्याची जागा पकडायची. बोंबा मारत इतवारीच्या मोहल्ल्यांमधून या मारबती मिरवतात. सोबत बडगेही असतात. "डेंग्युले घिऊन जाय गें मारबत..... बह्याडाले घेऊन जाय रे बडग्या..." रस्त्याच्या दुतर्फा तोबा गर्दी असते. या गर्दीत हरवून विस्फारलेल्या डोळयांनी मारबत पाहणं म्हणजे वैदर्भीय संस्कृतीचा भव्य-दिव्य सोहळा अनुभवणं असतं.

नागपूरची मारबत प्राचीन संस्कृतीचे प्रतीक आहेच. त्याचबरोबर आपल्या सामूहिक सुख-दुखा:चा ती एक आश्वस्त हूंकार आहे. जेव्हा तिची लेकरं 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' अशी मनापासुन साद घालतात, तेव्हा इडा-पीडा पोटात घेऊन ती माऊली धगधगत्या अग्नीला हसत हसत आलिंगन देते.

**- प्रविण बागडे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मालवण छत्रपती शिवाजी महाराजांच्या उध्वस्त व जमीनदोस्त पुतळ्याचे आरोपीचा शोध थेट "लाडकं जावई" कनेक्शन शहापूरच्या सासुरवाडीला..!

■ आजही शहापूर व परिसरात पोलिस गुप्तचर यंत्रणा कार्यरत
■ होटेल, लॉजिंग,रेलवे स्टेशन फार्महाऊसवर शोधमोहीम जोरात. !



**शहापूर** - अवघ्या देशात नाचक्की झालेल्या सिंधुदुर्ग मालवण मधील छत्रपती शिवाजी महाराजांचा उध्वस्त पुतळा उभारण्या -या कल्याणच्या फरार आरोपी जयदीप आपटे याचे शोधासाठी शहापूरच्या सोनार आळीतील सासुरवाडीला व परिसरात कल्याण व सिंधुदुर्ग पोलीसांनी ठाण मांडले आहे. या विटंबित घटनेमुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून पोलिसांकडून मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उध्वस्त होण्यासाठी जबाबदार असणाऱ्या कल्याणला राहणाऱ्या आर्टिस्टरी कंत्राट एजन्सी चे शिल्पकार जयदीप आपटे व स्ट्रक्चरल तज्ञ चेतन पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघे जण फरार झाले आहेत. कल्याणच्या जयदीप आपटे याचा सोनार आळीतील एका व्यावसायिकाची मुलगी निशीगंधा आपटे हिच्याशी नुकताच विवाह झाला होता. काल सकाळी कल्याण व सिंधुदुर्ग पोलीस पथकाने जयदीप आपटेच्या सासुरवाडीला शहापूरच्या सोनार आळीत धडक दिली.निशीगंधा आपटे यांच्या भावाची व सासूबाई यांची पोलीसांनी घरात काही वेळ चौकशी सुरू केली असता कोणताही प्रतिसाद जयदीप आपटे संदर्भात मिळाला नाही.

शोध मोहीमेत चार पोलिस पथके तयार करण्यात आली असून शहापूरच्या पंडित नाक्यावर एका होटेल मध्ये जयदीप आपटे बाबतीत चौकशी करून मुंबई नाशिक महामार्ग वरील होटेल लौजीग. फार्म हाऊस,रेलवे स्टेशनवर तपासणी करण्यात आली.

लाडका जावई जयदीप आपटेच्या शोधात शहापूर सोनार आळीत सासुरवाडीला तपासासाठी आलेल्या पोलिस पथकाबददल शहापूर, कसारा,वासिंद, किन्हवली पोलिसांना व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग पोलीसांना थांगपत्ताही नव्हता. गुप्तचर विभागाच्या पोलिस पथकाने आजही जयदीप आपटे व स्ट्रक्चरल तज्ञ चेतन पाटील यांना बेड्या ठोकण्यासाठी शोध मोहीम शहापूर व परिसरात आजही वेगाने सुरू ठेवली असल्याचे समजते.

# स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेअंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त यांची शहरातील सोसायट्यांना सदिच्छा भेट



**मिरा भाईंदर** - मिरा भाईंदर शहर स्वच्छ आणि सुंदर होण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेची जागृती करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा. प्र.से.) यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेला मिरा भाईंदर शहरातील सोसायटी, शाळा, हॉस्पिटल, हॉटेल्स, शासकीय कार्यालय, महाविद्यालय आणि मार्केट यांना मार्गदर्शन व स्टार रँकिंग बाबत संबोधित करण्यात आले. या स्पर्धेत विजयी स्पर्धकाला प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

मा. आयुक्त यांनी MICL कॉम्प्लेक्स, स्कायलाईन कॉम्प्लेक्स आणि सृष्टी कॉम्प्लेक्स अशा तीन नागरी वसाहतींना सदिच्छा भेट देत कचरा विलगीकरण, कॉम्प्लेक्स परिसरातील स्वच्छता तसेच RRR सेंटर संबंधित नागरिकांना विशेष मार्गदर्शन केले आणि स्वच्छता स्टार रँकिंग दिलेल्या उल्लेखनीय प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त केले. यामध्ये मा. आयुक्त यांनी RRR centerअंतर्गत Know your donation हा उपक्रम सोसायट्यांनी राबवुन मूल्यवान वस्तुंचे Donation गरजू व्यक्तिंना करावे असे आवाहन केले.स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेत घनकचरा वर्गीकरण, शौचालय व्यवस्थापन, परिसरातील स्वच्छता व इतर नाविन्यपूर्ण गोष्टीसाठी सर्व आस्थापनांना 1 स्टार, 3 स्टार, 5 स्टार आणि 7 स्टार अशा प्रकारची स्टार रँकिंग देण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये 153 शाळा, 85 हॉटेल, 270 गृहनिर्माण संस्था, 28 हॉस्पिटल, 10 शासकीय कार्यालय व 1 मार्केट इतक्या आस्थापनांनी सहभाग नोंदवला आहे. यापुढेही मिरा-भाईंदर शहर प्रदूषण मुक्त तसेच आणखीन स्वच्छ आणि सुंदर कसे होईल याचा विचार करून जे जे उपक्रम महापालिकामार्फत राबविण्यात येतील त्या उपक्रमात असेच उत्कृष्ट सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले.

# कलेचे रूपांतर झाले केश कर्तनालयात आदिवासी राजेश भलाची स्वयंरोजगारातून सुरू झाली आर्थिक उन्नतीकडे वाटचाल



**ठाणे** - ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील सावर्णे या गावचा राजेश अनंत भला हा आदिवासी म-ठाकूर सुशिक्षित बेरोजगार राजेश अनंत भला या तरुणाने रोजगरची भटकंती सोडून केशकर्तनालयाचा छंद आणि कलेचे रूपांतर आदिवासी विकास प्रकल्पाच्या आर्थिक सहाय्यातून आत्याधुनिक केश कर्तनालयाच्या व्यवसायात केले, राजेशची आता आर्थिक उन्नतीकडे आत्मविश्वासाने वाटचाल सुरू झाली आहे, राजेशची ही यशोगाथा आदिवासी बेरोजगारांना स्फूर्ती देणारी ठरावी... ठाणे जिल्ह्याच्या मुरबाड तालुक्यातील सावर्णे गाव माळशेज घाटाच्या पायथ्याशी आसलेले आदिवासी समाजबहुल गावठाण्यापासून 115 किलोमीटर अंतरावर आहे. गावची लोकसंख्या सुमारे पाचशे असून राजेश अनंत भला सावरणेगावचा रहिवासी आहे. बारावीपर्यंत शिक्षण घेतलेला सुशिक्षित बेरोजगार तरुण. राजेशाचे वडील तुटपुंजी शेती करतात, त्यांच्या शेती कमाला तो मदत करीत असे. शेती नंतर रोजगारासाठी आजू-बाजूच्या गावात भटकंती हा या कुटुंबाचा दिनक्रम. या दृष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी राजेशने मुरबाड तालुक्यातील मोरोशी येथील पोष्ट बेसिक आश्रमशाळेत बारावी पर्यंत शिक्षण घेतले. बारावी नंतर तो आठमहीने बेरोजगार होता. आता या बेरोजगरितून बाहेर पडायचे तर काही तरी करायचा चंग त्याने मनाशी बांधला. पण कमी भांडवलामुळे व्यवसाय करण्याचे धाडस त्याला होईना. त्याला केश कर्तनाच्या कामाची आवड होती. त्याने ही कला छंद म्हणून जोपासण्याचा निर्णय घेतला. त्याने सावर्णेया आपल्या गावच्या घरातच कमी भंडावलातील केश कर्तनालयाच्या व्यवसाय करण्यासाठी ऐक छोटा आरसा, कैची, वस्तारा, दाढीचा समान खरेदी करून घरच्या घरी केस कापणे आणि दाढीचा व्यवसाय सुरू केला. त्याच्या या प्रामाणिक व्यवसायाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळू लागल्याने त्याची आर्थिक कमाई वाढू लागली. राजेशआता स्वत:च्या पायावर उभा राहील.

# वाढवण बंदराचा पायाभरणी व १५३६ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ

वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचे आर्थिक चित्र बदलणार - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी



**पालघर (जिमाका)** - देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासात मच्छिमार बांधवांचे मोठे योगदान आहे. वाढवण बंदर हा जगातील सर्वात खोल व मोठ्या बंदरांपैकी एक महत्त्वपूर्ण बंदर होणार आहे. या प्रकल्पामुळे या परिसराचे आर्थिक चित्र बदलणार आहे. आता हा परिसर रेल्वे व महामार्गांशीही जोडला जाणार असून यामुळे या परिसरात नवनवीन व्यापार सुरू होतील. या बंदराचा लाभ महाराष्ट्राबरोबरच या भागातील स्थानिकांना व त्यांच्या पुढील पिढ्यांना होणार आहे, असे प्रतिपादन देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. सुमारे ७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पाचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पालघरमधील सिडको मैदानात आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय बंदर विकास, जहाज व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन राज्यमंत्री जॉर्ज कुरियन, केंद्रीय बंदर विकास, जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, बंदर विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार श्रीनिवास वनगा, आमदार निरंजन डावखरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेश वाघ, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे आदी यावेळी उपस्थित होते. सर्व लाडक्या बहिणी व भावांना तुमच्या या सेवकांचा नमस्कार, अशा शब्दांत मराठी भाषेतून संवाद साधत प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी संत सेनानी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वंदन करून भाषणाची सुरूवात केली. सिंधुदुर्ग येथील घटनेबद्दल छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणाशी मस्तक टेकून मी माफी मागतो, असे सांगून प्रधानमंत्री पदासाठी नाव घोषित झाल्यानंतर मी सर्व प्रथम रायगड येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीवर जाऊन प्रार्थना केली होती.

# ठाण्यात यावर्षी गणेश मूर्ती विसर्जनासाठी फिरती व्यवस्थाही सज्ज

चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये ०६ फिरत्या व्यवस्था सज्ज राहणार महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या संकल्पनेतून नागरिकांच्या सोयीसाठी केली जाणार व्यवस्था त्याचबरोबर, ०९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मूर्ती स्वीकृती केंद्र आणि ४९ टाकी विसर्जन व्यवस्थाही सज्ज

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रात यंदा गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी सहा फिरत्या विसर्जन व्यवस्थांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या संकल्पनेतून ही व्यवस्था तयार झाली असून त्यात विसर्जनाची व्यवस्था असलेला ट्रक ठरलेल्या वेळी वेगवेगळया ठिकाणी फिरणार आहे. त्या ट्रकवरील टाकीत गणेश मूर्तींचे विसर्जन करता येणार आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, बांधकाम विभाग, पर्यावरण विभाग आणि घनकचरा विभाग यांनी विसर्जन व्यवस्थेचे नियोजन केले आहे. त्यात, ०९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मूर्ती स्वीकृती केंद्र आणि ४९ ठिकाणी टाकी विसर्जन व्यवस्था आणि सहा फिरत्या विसर्जन व्यवस्था यांचा समावेश आहे.

यावर्षी, ०८ (दीड दिवस), १२ (सहा दिवस) आणि १४ सप्टेंबर (१० दिवस) अशा तीन दिवशी ही फिरती विसर्जन व्यवस्था नोपाडा-कोपरी, माजिवडा-मानपाडा, वागळे आणि वतर्कनगर या चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपलब्ध असेल. सकाळी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध राहील. त्यावरील टाकीमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करता येईल. या विसर्जन व्यवस्थेचे वेळापत्रक ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

महापालिकेच्या ऑनलाईन आणि ऑफलाईन व्यवस्थेत महापालिका क्षेत्रातील एकूण २१४ मंडळांनी परवानगीसाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी १८४ मंडपांच्या परवानगी देण्यात आल्या आहेत. उर्वरित मंडप परवानगीची प्रक्रिया सुरू असून त्या लवकरच दिल्या जातील, अशी माहिती आयुक्त राव यांनी दिली.

## ‘फिरत्या व्यवस्थेलाही प्रतिसाद लाभेल’

फिरत्या विसर्जन व्यवस्थेमुळे नागरिकांना विसर्जनाची आणखी एक सुविधा उपलब्ध होणार आहे. ठाण्यातील गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक असावा यासाठी महापालिकेचे प्रयत्न आहेत. त्याला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसाच तो या फिरत्या व्यवस्थेलाही मिळेल, असा विश्वास आयुक्त राव यांनी व्यक्त केला आहे.

# प्रतिबंधात्मक, अविघटनशील प्लास्टिकवर, कारवाई सुरू राहणार पालिका आयुक्त अजय वैद्य



**भिवंडी** - भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथकांनी अविघटनशील एकल वापर अंदाजे 500 किलो प्लॅस्टिक जप्त केले. महाराष्ट्र शासन यांचे मार्फत आगामी काळात सर्व सण व उत्सव पर्यावरणपुरक साजरे करणेबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झाले असुन त्याअनुषंगाने भिवंडी शहरातील एकल वापर प्लॅस्टिक बंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिले आहेत. त्यानुसार प्लॅस्टिक निर्मुलन पथक तयार करणेत आलेला आहे. प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांचे निर्देशानुसार महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथकांनी शहर विकास विभागाचे नियंत्रण अधिकारी सुदाम जाधव यांच्या नेतृत्वाखाली शहर विकास विभागाचे कार्यालय अधीक्षक सोमनाथ सोष्टे, पर्यावरण विभाग प्रमुख अनिल आव्हाड, हनुमान म्हात्रे, संजय केणे, गणेश श्रीमल, बिपीन गायकवाड यांनी दिनांक २९/०८/२०२४ रोजी श्री. विनोदकुमार मगनलाल वसानी, ३१६/१, कासार आळी, नझराना कम्पाऊंड, भिवंडी या ठिकाणी धाड टाकली असता जनरल आयटम्स्, प्लास्टिक पिशवी (अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक) साठा अंदाजे ५०० किलो माल जप्त करण्यात आलेला आहे.

# हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौपाटीच्या दुसऱ्या टप्प्याचे रविवारी होणार लोकार्पण

आमदार प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली पाहणी



**ठाणे** : केंद्र आणि राज्य सरकार, ठाणे महानगरपालिका, ठाणे स्मार्ट सिटी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने नागला बंदर खाडीलगत विकसित करण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौपाटी, गायमुखच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण रविवार, ०१ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची शुक्रवारी आमदार प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाहणी केली.

गायमुख येथे, स्मार्ट सिटीच्या कामांच्या अंतर्गत येथे सुमारे ८०० मीटरची लांबी असलेल्या या चौपाटीवर जेट्टी, गणेश विसर्जन घाट, दशक्रिया विधी घाट, खाडी लगत पादचाऱ्यांसाठी पदपथ, रस्त्यालगत पदपथ, मियावाकी उद्यान, आसनव्यवस्था, अम्फी थिएटर, वाहन पार्किंग व्यवस्था, प्रसाधनगृहे, विद्युत रोषणाई आणि सीसीटीव्ही आदी सुविधा करण्यात आल्या आहेत.

दशक्रिया विधी घाट येथे सध्या बांधण्यात आलेली शेड अपुरी आहे. ती मोठी असावी, अशी स्थानिक नागरिकांची मागणी असल्याचे यावेळी आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. त्यानुसार, वाढीव शेड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी अधिकाऱ्यांना दिले.

मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण होत आहे. त्यामुळे ठाणेकरांना फिरण्यासाठी, कौटुंबिक सहलीसाठी एक चांगली व्यवस्था तयार झाली आहे. मुंबई महानगर प्रदेशातील ही सगळ्यात मोठी चौपाटी ठरणार आहे. त्यानुसार, या चौपाटीचा विकास करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्त राव यांनी सांगितले. त्याचबरोबर, नागला बंदर येथेच आरमाराची प्रतिकृती साकारण्यात येणार असून हा नागला बंदर वॉटरफ्रंट डेव्हलपमेंटचा तिसरा टप्पा असेल. त्याचे भूमिपूजनही मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते होणार असल्याची माहितीही आयुक्त राव यांनी दिली. या पाहणी दौऱ्यात, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त दिनेश तायडे आणि मनोहर बोडके, सहाय्यक नगररचना संचालक संग्राम कानडे, उपनगर अभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, संजय कदम, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान आदी अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर, नागला बंदर नाक्यानजिक होत असलेल्या सर्वधर्मीय स्मशानभूमीच्या जागेची तसेच, कासार वडवली येथील विविध समाज भवनांच्या इमारतीची पाहणीही आमदार प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली.

## सलमान खानच्या बॉडीगार्डने घेतली कोट्यावधींची आलिशान कार



बॉलीवूडचा भाईजान अभिनेता सलमान खानचे फक्त देशातच नाही, तर संपूर्ण जगभरात मोठ्या प्रमाणात चाहते आहेत. सलमान एक उत्तम अभिनेता असला तरी तो माणुसकी जपणारा कलाकार आहे, असं म्हणत फॅन्सकडून सलमानच्या चित्रपटांना कायमच डोक्यावर घेतलं जातं. जसं या भाईजानला चाहत्यांकडून भरभरून प्रेम मिळतं, तितकंच प्रेम त्याला त्याचे बॉडीगार्डही देतात. सलमानचा बॉडीगार्ड शेरा याने नुकत्याच त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून केलेल्या पोस्टवर अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. शेराने पोस्ट केलेले हे सध्या फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

सलमानचा बॉडीगार्ड शेराने नव्या गाडीचे फोटो इन्स्टाग्रामवर पोस्ट केले आहेत. त्याने घेतलेली ही गाडी तब्बल १.४ कोटींची असल्याचं सांगितलं आहे. शेराने काळ्या रंगाची Range Rover ही आलिशान कार खरेदी केली आहे. 'सर्व सकारात्मक शक्तींच्या आशीर्वादाने नव्या सदस्याचं कुटुंबात स्वागत करत आहे', असं कॅप्शन देत त्याने नव्या गाडीबरोबरचे फोटो इन्स्टाग्रामवर पोस्ट केले आहेत.

सलमान खानचा बॉडीगार्ड म्हणून शेरा २० वर्षांपासून त्याच्याबरोबर आहे. संपूर्ण सिनेसृष्टी आणि चाहतेदेखील सलमानला 'भाई' या नावाने हाक मारतात. मात्र, शेरा सलमानला 'मालिक' असं म्हणतो. द इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, शेराने सांगितलं की, "सलमान खान माझ्यासाठी देवमाणूस आहे. तुम्ही ज्याच्या हाताखाली काम करता, ती व्यक्ती म्हणजे 'मालिक' असं प्रत्येक वेळी एकच अर्थ होत नाही. 'मालिक' या शब्दाचा खरा अर्थ म्हणजे देव. आपण देवाला आदरार्थी 'मालिक' असं म्हणतो.

## पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताचा डबल धमाका

# अवनी लेखराला सुवर्ण तर मोना अग्रवालनं जिंकलं कांस्यपदक

पॅरिस पॅरालिम्पिक 2024 मध्ये भारतीय नेमबाज अवनी लेखारानं धमाकेदार कामगिरी केली आहे. अवनीनं शुक्रवारी (30 ऑगस्ट) महिलांच्या 10 मीटर एअर रायफल (SH1) स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं. अवनीनं पॅरालिम्पिक विक्रमासह सुवर्णपदक जिंकलं. तर याच स्पर्धेत भारताच्या मोना अग्रवालनं कांस्यपदक जिंकलं. या दोन पदकांसह सध्या सुरु असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताचं खातं उघडलं आहे. भारताकडे एक सुवर्ण आणि एक कांस्य पदक आहे.

अवनीनं अंतिम फेरीत 249.7 गुण मिळवले, हा पॅरालिम्पिक विक्रम आहे. तर कांस्यपदक विजेत्या मोनानं 228.7 गुण मिळवले. अवनीनं टोकियो पॅरालिम्पिक (2020) मध्येही याच स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं. म्हणजेच तिनं आपल्या कामगिरीची पुनरावृत्ती केली आहे. या स्पर्धेत दक्षिण कोरियाच्या ली युनरीनं रौप्यपदक पटकावलं. अवनीनं टोकियो पॅरालिम्पिकमध्ये 50 मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक जिंकलं होतं. अवनी लेखरा ही पात्रता फेरीत दुसरं स्थान



मिळवून अंतिम फेरीत धडक मारण्यात यशस्वी ठरली. गेल्या वर्षभरापासून जबरदस्त फॉर्मात असलेली मोना अग्रवालही पाचव्या स्थानावर राहून आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरली. गतविजेत्या अवनीनं 625.8 गुण मिळवले आणि ती इरिना शेटनिकच्या मागे होती. इरिनानं पॅरालिम्पिक पात्रता फेरीत 627.5 गुणांसह नवा विक्रम प्रस्थापित केला.

दोन वेळा विश्वचषक सुवर्णपदक विजेती मोनानं तिच्या पहिल्या पॅरालिम्पिकमध्ये 623.1 गुण मिळवले. अवनी तीन वर्षांपूर्वी टोकियो पॅरालिम्पिकमध्ये SH1 प्रकारात सुवर्णपदक जिंकल्यानंतर देशातील सर्वाधिक प्रसिद्धी मिळवणारी पॅरा ॲथलीट बनली. कार अपघातात तिच्या खालच्या शरीराला गंभीर दुखापत झाल्यानंतर अवनी व्हीलचेअर वापरते. नेमबाजीमध्ये, SH1 श्रेणीमध्ये अशा नेमबाजांचा समावेश होतो, ज्यांनी त्यांच्या हातांच्या हालचालींवर, खालच्या धडावर, पायांवर परिणाम केला आहे किंवा त्यांच्या हाता-पायांनी ते दिव्यांग आहे.

## हाताविना तिरंदाजी करणाऱ्या शीतल देवीची पॅरालिम्पिकमध्ये रेकॉर्डब्रेक सुरूवात

पॅरिस पॅरालिम्पिक खेळांना पॅरिसमध्ये सुरुवात झाली आहे. खेळांच्या पहिल्या दिवशी भारताचे पॅरा बॅडमिंटनपटू, तायक्वांदो आणि तिरंदाज मैदानात उतरले होते. भारताची एकूणच पॅरालिम्पिकमधील सुरूवात चांगली झाली आहे. भारताच्या बॅडमिंटनपटूंनी आणि तिरंदाजांनी यशस्वी कामगिरी करत पुढील फेरी गाठली आहे. यादरम्यान भारतीय पॅरा ॲथलीट शीतल देवीने गुरुवारी इतिहास घडवला आहे.

हाताविना तिरंदाजी करणारी तिरंदाज शीतल देवी



हिने महिलांच्या वैयक्तिक कंपाउंड तिरंदाजीच्या पात्रता फेरीत चमकदार कामगिरी केली आणि ७२० पैकी ७०३ गुण मिळवून उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. या स्पर्धेत ती ७०३ गुणांसह दुसरी आली. शीतलने फक्त पुढील फेरी गाठली नाही तर वर्ल्ड रेकॉर्डही मोडला आहे. पण अवघ्या एका गुणासाठी शीतल नवा वर्ल्ड रेकॉर्ड रचण्यापासून लांब राहिली.

१७ वर्षीय शीतलने ग्रेट ब्रिटनच्या फोबी पीटरसनचा ६९८ गुणांचा रँकिंग फेरीचा जागतिक विक्रम मोडला. मात्र, तुर्कीच्या ओझ्नूर गिरदीने ७०४ गुणांसह नवा विश्वविक्रम आपल्या नावे केला आणि अव्वल स्थानी राहून राऊंड ऑफ १६ मध्ये पोहोचली. रँकिंग फेरीत शीतल दुसऱ्या क्रमांकावर राहिली. आता शीतल ३१ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता तिचा उपांत्यपूर्व सामना खेळेल. तिरंदाजी पात्रता फेरीत भारताची सरिताही सहभागी झाली होती. पात्रता फेरीत तिने ६८२ गुण मिळवले. ती ९व्या स्थानावर राहिली. ३० ऑगस्ट रोजी सरिता उपउपांत्यपूर्व फेरी गाठण्यासाठी खेळेल.

## "प्रवीण तरडेंना लोकांनी कामाचे स्वातंत्र्य", अहो विक्रमार्का चित्रपटातील सहकलाकाराचे मोठे वक्तव्य



मराठी चित्रपटसृष्टीत एक उत्तम दिग्दर्शक आणि अभिनेता अशी ओळख निर्माण करणारे अभिनेते म्हणजे प्रवीण तरडे हे आहे. 'मुळशी पॅटर्न', 'धर्मवीर', 'बलोच', 'सरसेनापती हंबीरराव', 'पांडू', 'देऊळ बंद' अशा अनेक चित्रपटातून त्यांनी दिग्दर्शन आणि अभिनयात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता प्रवीण तरडे 'अहो विक्रमार्का' या दाक्षिणात्य चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारताना दिसणार आहेत. या चित्रपटातील त्यांचे सहकलाकार देव गिल यांनी एका मुलाखतीदरम्यान प्रवीण तरडेंना लोकांनी चाकोरीबाहेर काम करू दिलं नाही, असे वक्तव्य केले आहे. 'अल्ट्रा बझ मराठी' या युट्यूब चॅनेलला प्रवीण तरडे आणि देव गील यांनी नुकतीच मुलाखत दिली. यावेळी प्रवीण तरडे यांच्याविषयी बोलताना अभिनेता देव गीलने म्हटले, "प्रवीण सरांना लोकांनी डब्ब्यात बंद करून ठेवले होते, स्वातंत्र्य दिले नव्हते.

## दिनविशेष

**घटना**

१९९७ : प्रिन्सेस डायना आणि तिचा मित्र डोडी अल फायेद ठार झाले.
१९९६: पांडुरंगशास्त्री आठवले यांना मॅगसेसे पुरस्कार प्रदान.
१९९१: किरगिझिस्तान सोविएत युनियनपासून स्वतंत्र झाला.
१९८४ : मचमुसिक कंपनी सुरवात.
१९७१ : अमेरिकन अंतराळावीर डेव्हिड स्कॉट चंद्रावर रोव्हर चालवणारा पहिला मानव ठरला.
१९७० : राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारकाचे उद्घाटन झाले.
१९६२: त्रिनिदाद व टोबॅगो युनायटेड किंगडमपासून स्वतंत्र झाले.
१९५७: मलेशियाला युनायटेड किंगडम पासून स्वतंत्र मिळाले.
१९४७ : भारताची प्रमाणवेळ निश्चित करण्यात आली.
१९२०: खिलाफत चळवळीची सुरुवात.
१९२०: खिलाफत चळवळीची सुरुवात.

**जन्म**

१९७९: युवन शंकर राजा भारतीय गायक-गीतकार आणि निर्माते
१९६९ : जवागल श्रीनाथ जलदगती गोलंदाज
१९६३ : ऋतुपर्णा घोष भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक
१९४४ : क्लाइव्ह लॉइड वेस्ट इंडीजचे क्रिकेटपटू
१९४० : शिवाजी सावंत - मृत्युंजय कादंबरीचे लेखक साहित्यिक (निधन : १८ सप्टेंबर २००२)
१९३१: जयवंत कुलकर्णी - पार्श्वगायक (निधन: १० जुलै २००५)
१९१९: अमृता प्रीतम - पंजाबी लेखिका व कवयित्री ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ३१ ऑक्टोबर २००५)

**मृत्यू**

२०२० : प्रणब मुखर्जी - भारताचे १३ वे राष्ट्रपती (जन्म: ११ डिसेंबर १९३५)
२०१४ : बापू - भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक (जन्म: १५ डिसेंबर १९३३)
२०१२ : काशीराम राणा भारतीय राजकारणी (जन्म: ७ एप्रिल १९३८)
१९९५ : बेअंत सिंग - पंजाब राज्याचे १२वे मुख्यमंत्री (जन्म: १९ फेब्रुवारी १९२२)
१९७३ : ताराबाई मोडक - शिक्षणतज्ज्ञ तसेच बालमंदिरांच्या निर्मात्या (जन्म: १९ एप्रिल १८९२)
१४२२ : हेन्री (पाचवा) - इंग्लंडचा राजा (जन्म: १६ सप्टेंबर १३८६)

## अरबाजच्या इमोशनचा बनलाय जोक, निक्की म्हणतेय डरपोक!

बिग बॉस मराठीच्या घरात दिवसेंदिवस समीकरणं दिवसेंदिवस बदलताना दिसत आहेत. गेल्या आठवड्यात टीम ए मध्ये फूट पडल्याचं पाहायला मिळालं. टीम A पासून निक्कीनं स्वत:ला वेगळं केल्याचं पाहायला मिळालं. निक्की आणि अरबाजमध्ये या आठवड्यात जोरदार भांडणं पाहायला मिळाली. दोघांनी एकमेकांसोबत खूप वाद घातला. या दोघांच्या भांडणाचा फायदा घरातील इतर सदस्यांनी घेतल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, निक्की आणि अरबाज पुन्हा एकत्र येणार असल्याचं प्रोमोमध्ये दिसत आहे.

बिग बॉसच्या घरातील सदस्य एकीकडे निक्की आणि अरबाजला एकमेकांपासून दूर ठेवायचा प्रयत्न करताना दिसत आहेत. अरबाजही सदस्यांचं ऐकून निक्कीसोबत कचाकचा भांडताना दिसला मात्र, अरबाजला निक्कीशिवाय करमत नसल्याचं दिसत आहे. निक्कीपासून दूर राहणं अरबाजला जमत नाहीय आणि त्याला करमतही नाहीय. अरबाजची गाडी फिरून-फिरून निक्कीकडे येत असल्याचं दिसत आहे.

## डायबिटीजची औषधे घेणे अचानक बंद केल्यावर शरीरावर काय परिणाम होतो?

आपल्या चांगल्या आरोग्यासाठी सुरू केलेली औषधे घेण्याचे महत्त्व आपल्या सर्वांना माहीत आहे. पण, जेव्हा आपल्याला औषधे घेतल्यावर काही दिवसांनी बरे वाटते तेव्हा आपण ते औषध घेणे बंद करतो. मात्र, आपल्याला सुरू असलेली औषधे अचानक बंद केल्यानं शरीरावर काय परिणाम होतो हे तुम्हाला माहिती आहे का? खास करून डायबिटीज असलेले रुग्ण डायबिटीजची औषधे जेव्हा अचानक बंद करतात, तेव्हा शरीरावर काय परिणाम होतो हे जाणून घेऊयात. द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना खार येथील हिंदुजा हॉस्पिटल आणि एमआरसी, सल्लागार, मधुमेहशास्त्र, पी. डी. डॉ. मनोज चावला यांनी यासंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. डायबिटीज आता एक गंभीर आजार बनला आहे. भारतात डायबिटीजचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. जगभरात लाखो लोकांना डायबिटीज आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल



रिसर्च (ICMR) च्या मते, भारतात सुमारे १०१ दशलक्ष लोक डायबिटीजने ग्रस्त आहेत. डायबिटीज रुग्णांना खूप काळजी घ्यावी लागते. जीवनशैलीत बदल करणे औषधांद्वारे सतत काळजी घेणे. मात्र, औषधांमध्ये हलगर्जीपणा केल्यास रक्तातील साखरेच्या पातळीवर गंभीर परिणाम होऊ शकतात, त्यामुळे डायबिटीज रुग्णांना रोजच्या रोज औषधे घेणे गरजेचे आहे, असे डॉ. मनोज चावला सांगतात. डॉ. राजीव गुप्ता, डायरेक्टर, इंटरनल मेडिसिन, सीके बिर्ला हॉस्पिटल (आर), दिल्ली यांनी सांगितले की, मधुमेहावर कोणताही कायमस्वरूपी इलाज नाही. हे केवळ सुरुवातीला काही प्रकरणांमध्येच शक्य आहे, ते सुद्धा जीवनशैलीत बदल, वजन कमी करणे, काळजी आणि निर्धारित औषधोपचार करून डायबिटीजसारख्या परिस्थितींमध्ये अचानक औषधोपचार थांबल्यामुळे संक्रमणाचा धोका वाढू शकतो आणि डायबेटिक केटोॲसिडोसिससारख्या तीव्र गुंतागूंत होण्याची शक्यता असते, जी रक्तातील ॲसिड तयार होण्याद्वारे दर्शविलेली जीवघेणी स्थिती असू शकते. त्वरित उपचार न केल्यास की कोमात जाऊ शकतोअसे डॉ. गुप्ता यांनी स्पष्ट केले. "औषधे बंद केल्याने अंधत्व, मूत्रपिंड निकामी होणे यांसारख्या समस्या होऊ शकतात. वजन कमी होणे, निर्जलीकरण, थकवा आणि औषधांची कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता आहे, असंही डॉक्टर सांगतात.

## राशि भविष्य

**मेष** – तुमच्या आरोग्याच्या सुधारणेसाठी पुन्हा पहिल्यापासून प्रयत्न सुरु करण्यासाठी चांगला दिवस आहे. कुणी ही अनुभव नसलेल्या व्यक्तीच्या सल्ल्याने आज असे कुठले ही काम करू नका ज्यामुळे तुम्हाला आर्थिक हानी होईल. सामाजिक एकत्रिकरण सोहळयात तुमच्या थट्टेखोरपणामुळे तुम्ही लोकप्रिय ठराल.

**वृषभ** – आज तुम्हाला जादुई असे आशादायी वातावरण अनुभवास येईल. अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील. प्रिय व्यक्तीसोबत वादावादी होऊ नये यासाठी वादग्रस्त विषय टाळा. कोणीतरी मागणी घालण्याची शक्यता आपल्या पत्रिकेत दिसून येते.

**मिथुन** – चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तसे तर आपला पैसा दुसऱ्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, आज तुम्ही कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल. तुमच्या खेळकर-खोडकर स्वभावामुळे अवतीभवतीचे वातावरण प्रसन्न बनेल.

**कर्क** – तुमच्या चपळ कृतीमुळे तुम्हाला उत्तेजन मिळेल. यश मिळविण्यासाठी वेळकाळ पाहून तुमच्या संकल्पनांमध्ये बदल करा. त्यामुळे तुमचा दृष्टिकोन विस्तारेल - तुमचे क्षितीज व्यापक बनेल - तुमचे व्यक्तिमत्व वृद्धिंगत होईल आणि तुमचे मन सुखावेल. जर तुम्ही लोन घेणार असाल आणि बऱ्याच दिवस याच कामात असाल तर, आजच्या दिवशी तुम्हाला लोन मिळू शकते.

**सिंह** – आजच्या दिवशी आराम करणे अत्यंत गरजेचे आहे. गेले काही दिवस अनेक प्रकारे मानसिक तणावात असल्यामुळे, थोडी मौज मजा, करमणूक केल्याने तुम्हाला चांगला आराम लाभेल. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल.

**कन्या** – अमर्याद ऊर्जा आणि उत्साह तुमच्यात सतत सळसळत राहील. त्यामुळेच मिळालेल्या प्रत्येक संधीचा तुम्ही योग्य फायदा घेऊ शकाल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला महत्त्वाच्या खरेदीसाठी सोयीस्कर ठरतील. एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल.

**तूळ** – अंगदुखीची दाट शक्यता आहे. शारिरीक ताण घेऊन काम करणे टाळा. कारण त्यामुळे शरीरावर अतिरिक्त ताण येईल. पुरेशी विश्रांती घ्यायला विसरू नका. आज तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे. वयोवृद्ध नातेवाईक अवाजवी मागण्या करण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** – आरोग्याच्या भल्यासाठी उगा त्रागा करु नका. आपल्या धनाचा संचय कसा करावा याचे कौशल्य आज तुम्ही शिकू शकतात आणि याच कौशल्याला शिकून तुम्ही आपले धन वाचवू शकतात. आपल्या पत्नीच्या सफलतेचे कौतुक करा, तिच्या यशाने आनंदी व्हा आणि उज्ज्वल भविष्याची कामना करा.

**धनु** – तुमच्यापैकी काही जण बऱ्याच कालावधीपासून कामकाजासाठी खूप अतिरिक्त वेळ देत आहात आणि त्यामुळे तुमची ऊर्जा कमी झाली आहे - आज सगळया तणाव व द्विधा मन:स्थितीचा आजचा शेवटचा दिवस असावा असे तुम्हाला वाटेल.

**मकर** – चांगले इंटरेस्टिंग वाचन करून तुमच्या मनाला, विचारांना खाद्य पुरवा. आजच्या दिवशी घरातील इलेक्ट्रोनिक वस्तू खराब होण्याच्या कारणाने धन खर्च होऊ शकते. मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखदायक असेल. प्रणयराधना करण्याची भावना जोडिदाराकडून आज अनुभवता येईल.

**कुंभ** – तुमच्या अविचारी वागण्यामुळे बायकोशी तुमचे संबंध बिघडतील. कुठलाही मूर्खपणा करण्यापूर्वी तुमच्या वागणुकीच्या परिणामांबद्दल विचार करा. शक्य असेल तर तुमचा मूड बदलण्याचा प्रयत्न करा. आज कुणी जवळच्या व्यक्ती सोबत तुमचे भांडण होऊ शकते आणि ही गोष्ट कोर्टापर्यंत जाऊ शकते.

**मीन** – मानसिक शांततेसाठी तुमचा तणाव दूर करा. धनाने जोडलेल्या काही गोष्टींतून मार्ग निघू शकतो आणि तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. मित्रमंडळी मदतीसाठी तत्पर असतील आणि आपणास खरा आधार देतील. प्रेमात आज तुमचा सुदैवी दिवस आहे.

# पालिकेच्या एकाच शाळेत दोन मुख्याध्यापकांची नियुक्ती




**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या काही शाळा मुख्याध्यापकांविनाच चालवल्या जात आहेत. मात्र मुलुंड येथील गव्हाणपाडा माध्यमिक मराठी शाळेत शिक्षण विभागाने दोन मुख्याध्यापकांची नियुक्ती केली. या दोन्ही मुख्याध्यापकांपैकी कोणी कोणती जबाबदारी पार पाडायची याबाबतही शिक्षण विभागाने कोणतेही स्पष्ट आदेश दिलेले नाहीत. प्रशासनाच्या या कारभारामुळे शिक्षकांची मात्र कोंडी झाली आहे.

महानगरपालिका गव्हाणपाडा मराठी शाळेची पटसंख्या २५० हून अधिक आहे. या शाळेतील मुख्याध्यापक पद २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून रिक्त होते. मुख्याध्यापक नसल्याने शाळेचा कार्यभार वरिष्ठ शिक्षकांच्या हाती सोपविण्यात आला होता. संबंधित शिक्षक हे विद्यार्थ्यांचे वर्ग घेत शाळेचा गाडा चालवत होते. मात्र एप्रिल २०२३ मध्ये एस विभाग कार्यालयाच्या हद्दीतील भांडूपमधील एका शाळेतून कविता म्हसकुले यांची मुख्याध्यापकपदी तात्पुरती स्वरुपात बदली करण्यात आली. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये संगीता चव्हाण यांची गव्हाणपाडा मनपा शाळेत मुख्याध्यापकपदी पदोन्नतीने नेमणूक करण्यात आली. मात्र कविता म्हसकुले यांच्या अन्यत्र नियुक्तीबाबत कोणतीही सूचना शिक्षण विभागाकडून देण्यात आलेली नाही. त्यामुळे मागील दोन महिन्यांपासून गव्हाणपाडा मराठी शाळेत दोन मुख्याध्यापक कार्यरत आहेत. त्यामुळे नेमके कोणाचे आदेश पाळायचे, असा प्रश्न शिक्षकांसमोर निर्माण झाला आहे. दरम्यान, एका शाळेत दोन मुख्याध्यापक असू शकत नाहीत, परंतु असा प्रकार घडला असेल तर त्यासंदर्भात माहिती घेण्यात येईल, असे पालिकेचे शिक्षणाधिकारी राजू तडवी सांगितले.

### ‘वेतन वसूल करा’

महानगरपालिकेच्या अनेक शाळांमध्ये मुख्याध्यापकपद रिक्त आहे. परिणामी या शाळांचे कामकाज मुख्याध्यापकांविना चालवले जात असताना मुलुंडमधील गव्हाणपाडा शाळेला दोन मुख्याध्यापक देण्याची कामगिरी शिक्षण विभागाने केली आहे. प्रशासनाच्या या अजब प्रकाराची दखल ऑडिट विभागाने घ्यावी आणि एका मुख्याध्यापकाचे वेतन संबंधित प्रशासकीय यंत्रणेकडून वसूल करावे, अशी मागणी शिक्षण क्षेत्रातून होत आहे.

# हिंजवडीत घरांच्या किमती गगनाला भिडल्या!

## राज्यात डोंबिवली, पनवेलमध्ये सर्वाधिक वाढ



**पुणे :** देशभरात घरांच्या किमतीतील वाढ सातत्याने कायम आहे. यामुळे घरांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. प्रमुख महानगरांत घरांच्या किमतीत गेल्या पाच वर्षांत सुमारे ४५ टक्के वाढ झाली आहे. मुंबईतील डोंबिवली आणि पनवेलमध्ये ही वाढ अनुक्रमे ५० व ४० टक्के असून, पुण्यातील हिंजवडीत ही वाढ ३९ टक्के आहे.

देशातील मालमत्ता क्षेत्राचा अहवाल अनारॉक ग्रुपने जाहीर केला आहे. त्यात देशातील दिल्ली, मुंबई, पुणे, कोलकता, बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई या सात महानगरांचा समावेश आहे. या अहवालानुसार, देशातील सात महानगरांत घरांच्या किमतीत २०१९ च्या तुलनेत यंदा पहिल्या सहामाहीपर्यंत ४५ टक्के वाढ झाली आहे. देशात सर्वाधिक वाढ बंगळुरूमध्ये बागलुरू भागात ९० टक्के आहे. बागलुरूत घरांच्या किमती पाच वर्षांत प्रतिचौरस फूट ४ हजार ३०० रुपयांवरून ८ हजार १५१ रुपयांवर पोहोचल्या आहेत.

हैदराबादमध्ये कोकापेट भागात गेल्या पाच वर्षांत घरांच्या किमतीतील वाढ ८९ टक्के आहे. या कालावधीत घरांच्या किमती प्रतिचौरसफूट ४ हजार ७५० रुपयांवरून ९ हजार रुपयांवर गेल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत दिल्लीत द्वारका द्रुतगती मार्ग भागात घरांच्या किमतीतील वाढ ७९ टक्के आहे. त्याखालोखाल बंगुळरूतील सर्जापूर रस्ता भागात ५८ टक्के, हैदराबादमधील बाचुपल्ली ५७ टक्के व तेल्लापूर ५३ टक्के, मुंबईतील पनवेलमध्ये ५० टक्के, दिल्लीतील नवीन गुरूग्राममध्ये ४८ टक्के आणि मुंबईतील डोंबिवलीत ४० टक्के अशी वाढ झालेली आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले.

घरांच्या किमतीत करोनानंतर वाढ सुरू झाली. गेल्या दोन वर्षांत घरांच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. गेल्या पाच वर्षांत हैदराबादमध्ये घरांच्या किमतीत सर्वाधिक ६४ टक्के वाढ झाली आहे. त्याखालोखाल बंगळुरूत ५७ टक्के वाढ असून, दिल्ली व मुंबई ४८ टक्के आणि कोलकत्यात सर्वांत कमी २५ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. – अनुज पुरी, अध्यक्ष, अनारॉक ग्रुप

### घरांच्या किमतीतील वाढ २०१९ ते २०२४

**महानगर – भाग – वाढ (टक्क्यांमध्ये)**

- बंगळुरू – बागलुरू – ९०
- हैदराबाद – कोकापेट – ८९
- बंगळुरू – व्हाईटफिल्ड – ८०

**दिल्ली – द्वारका द्रुतगती मार्ग – ७९**

- बंगळुरू – सर्जापूर रस्ता – ५९
- हैदराबाद – तेल्लापूर – ५३
- मुंबई – पनवेल – ५०
- दिल्ली – नवीन गुरूग्राम – ४०
- मुंबई – डोंबिवली – ४०
- पुणे – हिंजवडी – ३९

# नंदुरबार जिल्ह्यात आश्रमशाळेतील विद्यार्थ्याचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू



**नंदुरबार** - नंदुरबार तालुक्यातील लोय आश्रमशाळेच्या एका आठ वर्षाच्या विद्यार्थ्याचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला. गुरुवारी पहाटे ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये भीती पसरली आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत नंदुरबार तालुक्यातील लोय येथे शासकीय आश्रमशाळा आहे. गुरुवारी पहाटे सहाच्या सुमारास आनंद वसावे हे खोलीकडे जात असताना त्यांनी इयत्ता बारावीत शिक्षण घेत असलेल्या जोल्या वसावे यास, आश्रमशाळेतील इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकत असलेला मनोहर कालूसिंग वसावे (आठ) हा नवीन वसतिगृहाच्या ठिकाणी हिंस्त्र प्राण्याच्या हल्ल्यात जखमी अवस्थेत पडला असल्याचे सांगितले. सदरची माहिती मुख्याध्यापक जितेंद्र माळी यांना मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ मिळेल त्या वाहनाने मनोहर यास नंदुरबार जिल्हा रुग्णालयात नेण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या.

मनोहर यास नंदुरबार जिल्हा रुग्णालयात नेल्यावर डॉ. जय पटले यांनी त्याची तपासणी करुन त्याचा मृत्यू झाला असल्याचे घोषीत केले. पहाटेच्यावेळी प्रात:विधीसाठी गेला असता मनोहरवर बिबट्याने हल्ला केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मुख्याध्यापक माळी यांनी दिलेल्या माहितीवरुन नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, घटनास्थळी वन विभागाच्या पथकाने भेट दिली. लोय येथील आश्रमशाळेत ७८१ विद्यार्थ्यांसाठी अवघे चार स्वच्छतागृह आहेत. यामुळे अनेक विद्यार्थी प्रात:विधीसाठी बाहेर जातात. नूतन वसतिगृहाचे काम सुरु आहे. परंतु, ते संथपणे होत असल्याने अद्याप शाळेच्या ताब्यात देण्यात आलेले नाही. गेल्या महिन्यात राज्यपालांच्या दौऱ्याची चर्चा असल्याने ठेकेदाराकडून वसतिगृह इमारतीच्या कामाला गती देण्यात आली होती.

# चेतन पाटील अखेर पोलिसांच्या तावडीत

## कोल्हापूर पोलिसांची कारवाई



**कोल्हापूर :** राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्यानंतर बेपत्ता झालेले पुतळ्याचे बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील अखेर पोलिसांच्या तावडीत सापडले. कोल्हापूर पोलिसांनी रात्री उशिरा घरात जावून त्यांना ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने ही कारवाई केली आहे. मालवण पोलीस ठाण्यात चेतन पाटील यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल आहे.मालवण राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी दोघाजणांवर गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यामध्ये शिल्पकार जयदीप आपटे तसेच कोल्हापुरातील शिवाजी पेठ येथे राहणाऱ्या चेतन पाटील यांचा समावेश होता. पाटील यांच्या अटकेसाठी मालवणचे एक पोलीस पथक कोल्हापुरात तळ ठोकून होते.

# ‘धारावी’साठी अद्याप एक एकरचाही ताबा नाही

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी ५५० ते ६०० एकर जागेची आवश्यकता आहे. त्यानुसार धारावीबाहेरील विविध ठिकाणच्या जागेची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. मात्र अद्याप एक एकरही जागा ताब्यात आलेली नाही, अशी माहिती धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी दिली.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत पात्र रहिवाशांना ३५० चौरस फुटाचे घर देण्यात येणार आहे. दुसरीकडे पहिल्यांदाच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अपात्र रहिवाशांनाही समावून घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. मात्र धारावीतील अपात्र रहिवाशांना धारावीबाहेर घरे देण्यात येणार आहेत. धारावी पुनर्विकासासाठी उपलब्ध असलेली धारावीतील जागा आणि लोकसंख्येची घनता लक्षात घेता अपात्रांना अन्यत्र घरे देणे क्रमप्राप्त झाल्याचे श्रीनिवास यांनी स्पष्ट केले.

# Cyclone Asna Brewing Over Arabian Sea, Warns IMD; All About Rare August Storm Near Gujarat

**Gujarat-** In a rare phenomenon, an uncommon cyclone is brewing over the Saurashtra-Kutch region of Gujarat and is expected to shape over the Arabian Sea on Friday (August 30), according to the India Meteorological Department (IMD). If this cyclone does develop, it will be only the second such event in the Arabian Sea during August in over five decades.

In a national bulletin, IMD said the deep depression over Saurashtra and Kutch is likely to move west-southwestwards, and emerge over the northeast Arabian Sea off Kutch and adjoining Pakistan coasts and intensify into a cyclonic storm on Friday. Once it strengthens into a cyclone, it will be named Asna, a name provided by Pakistan.

Even if the deep depression intensifies into a cyclonic storm, it is highly unlikely that it will impact the Indian coastline. As per IMD, the cyclone is expected to travel from the Saurashtra-Kutch location of Gujarat in the direction of the Oman coast.

# आत्मा मालिक येथे विद्यार्थी सुरक्षा उपाययोजना सभेचे आयोजन!




**वासिंद** (प्रतिनिधी)- शिक्षण विभाग पंचायत समिति शहापूर या विभागाच्या वतीने आयोजित येथील मोहिली-अघई विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट (कोकामठाण) संचलित, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुल येथे विदयार्थी व विद्यार्थिनी सुरक्षा उपाययोजना बाबत सभेचे आयोजन करण्यात आले होते. बदलापूर येथील घडलेल्या लहान शाळकरी मुलीच्या अत्याचार घटनेनंतर 21ऑगस्ट 2024 या शासन निर्णयानुसार शासनाने शाळांमध्ये विविध सुविधा व उपाययोजना बाबत आदेश जारी केले आहेत. या अनुषंगाने तालुका शिक्षण अधिकारी बी.टी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध विभाग नुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाययोजना बाबत सभेचे आयोजन करण्यात येत आहे. यानुसार अघई विभागीय सुरक्षा उपाययोजना बाबत या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर, सभेवेळी संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव यांनी आत्मा मालीक माऊलींच्या कार्याबद्दल माहिती दिली व ध्यान साधनेने आपण आपल्या समस्यांचे निवारण करू शकतो असे सांगितले. तसेच सभेमध्ये शासन निर्णयानुसार शालेय स्तरावरील विविध समित्या त्यांची रचना व कार्य तसेच सीसीटीव्ही, तक्रार पेटी, इ विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे सुरक्षे साठी करावयाचे उपाययोजनांवर सविस्तर माहिती दिली. तर ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा 2023’ शहापूर तालुक्यामधून आत्मा मालीक इंटरनेशनल स्कूल ला प्रथम पारितोषिक 3 लाख रुपये जाहीर झाल्याबद्दल उपस्थित शिक्षण विभाग अधिकारी यांच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले. या सभेवेळी संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव, संकुलाचे शैक्षणिक संचालक डॉ .डी डी शिंदे, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य अनंत गायकवाड, शिक्षण विभाग विस्तार अधिकारी रामचंद्र विशे, केंद्रप्रमुख बाळकृष्ण बांगर, आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूल प्राचार्य कैलास थोरात, ज्युनिअर कॉलेज प्राचार्य, पंकज बडगुजर, आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल प्राचार्य अनिल पाटील, व्यवस्थापक गुलाब हिरे व वसतिगृह विभाग व्यवस्थापक दत्तात्रेय तेलोरे आदी विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख, विविध शाळा संस्थाचालक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, मुख्याध्यापक, पोलीस पाटील व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# कल्याण-कोल्हापूर कोंडुस्कर ट्रॅव्हल्सच्या बसमध्ये प्रवाशाचा ऐवज चोरीला



**कल्याण** – कल्याण ते कोल्हापूर या प्रवासासाठी कोंडुस्कर ट्रॅव्हल्सच्या बसमधून प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाचा सोन्याचा दोन लाख ७५ हजार रूपयांचा ऐवज बसमधून चोरीला गेला आहे. प्रवासात ही चोरी झाल्याने बसमधील कोणा इसमानेच ही चोरी केली असण्याचा संशय तक्रारदाराला आहे. गेल्या गुरुवार, शुक्रवारच्या कालावधीत बस प्रवासात हा प्रकार घडला आहे. प्रवीणकुमार मनोहर थोरात (४३) असे तक्रारदाराचे नाव आहे. ते मूळचे कोल्हापूर येथील रहिवासी आहेत. ते नोकरीनिमित्त कल्याण मधील रामबाग भागात राहतात. पोलिसांनी सांगितले, प्रवासी प्रवीणकुमार थोरात हे गुरुवारी रात्री नऊ वाजता कोंडुस्कर ट्रॅव्हल्सच्या बसमध्ये कल्याण पश्चिमेतील सहजानंद चौकातील रामदेव हॉटेलमध्ये बसले. ते शुक्रवारी सकाळी ११ वाजता कोल्हापूर येथे उतरले. घरातून निघताना तक्रारदार थोरात यांनी दोन लाख ७५ हजार रूपयांचा ऐवज असलेली सोन्याची पिशवी बंदिस्त करून ती मोठ्या पिशवीमध्ये तळाला इतर कपड्यांच्या मध्ये ठेवली होती.

# Revanth Reddy Expresses 'Unconditional Regret' After SC Pulls Up Telangana CM For Remark On Kavitha Bail Order



**Telangana -** A day after Supreme Court on Thursday took a strong exception on statements made by Telangana Chief Minister Revanth Reddy over the bail granted to BRS leader K Kavitha, the CM expressed regret over his statements against Apex Court order. Further, the CM said that the remarks attributed in the reports have been taken out of context. Taking to X, Revanth Reddy said, “I have the highest regard and full faith in the Indian Judiciary. I understand that certain press reports dated 29th August, 2024 containing comments attributed to me have given the impression that I am questioning the judicial wisdom of the Hon’ble Court.”

“I reiterate that I am a firm believer of the judicial process.I unconditionally express my regret for the statements reflected in the press reports. The remarks attributed to me in such reports have been taken out of context. I have unconditional respect & highest regard for the Judiciary & its independence. As a firm believer in the Constitution of India and its ethos, I have and continue to hold the Judiciary in its highest esteem,” he said.

# Bengaluru Car Owners Beware! Thieves Are Now Targeting Laptops, Wallets In Parked Vehicles In Crowded Areas



**Karnataka -** Burglars targeted multiple parked cars on a bustling street, using a specialized tool to steal laptops and other valuables in Bengaluru’s Indiranagar area. The incident took place around 7:30 p.m. on August 22 in busy Indira Nagar Main 100ft road, near Global Desi and Westside stores. The thieves managed to break the windows of four cars, swiftly snatching three bags containing laptops and other items of value.

Surya, one of the victims, shared his experience on social media, calling for urgent action from local authorities. “I’m one of the victims,” Surya wrote. “CCTV footage shows it all. One guy uses a special device to silently break windows (cops say this is common). Another dude distracts the security guard. They grab bags and dash off - all in plain sight on a crowded street!” He added that this was not an isolated incident, as similar thefts had reportedly occurred on the same street before. “Bengaluru streets are feeling less safe by the day. @blrcitypolice, we need your swift action to investigate and prevent these crimes. To everyone else, please stay alert and avoid leaving valuables in plain view in your cars,” he urged.

Surya’s post, which went viral after being shared on August 28, has garnered over 1.5 million views, with more people continuing to share their thoughts and concerns in the comments. Many expressed a growing unease about safety in the city and echoed the need for stronger police presence and vigilance in such areas.

# गणेश विसर्जनासाठी २०४ कृत्रिम तलाव



● मुंबई, (प्रतिनिधी) :

यंदा गणेशोत्सवात गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची संख्या वाढविण्यात येणार असून संपूर्ण मुंबईत २०४ कृत्रिम तलाव तयार करण्यात येणार आहेत. तसेच ६९ नैसर्गिक विसर्जनस्थळांची व्यवस्थाही उपलब्ध आहे. कृत्रिम तलावात विसर्जनसाठी भक्तांकडून प्रतिसाद वाढत असून गेल्या अकरा वर्षांत कृत्रिम तलावातील गणेश विसर्जनाच्या प्रमाणात तब्बल ३७१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या दहा दिवसांच्या उत्सवासाठी मुंबई महापालिकेने तयारी केली आहे. यंदा गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची संख्या वाढवण्याची मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने केली होती. त्यानुसार पालिकेने गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा कृत्रिम तलावांची संख्या वाढवली आहे. गेल्यावर्षी १९४ कृत्रिम तलाव होते व ७६ हजारांहून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले होते.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा यासाठी पालिका प्रशासनाने मूर्तिकारांना शाडूची मातीही पुरवली आहे. मात्र तरीही अनेक ठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती आणल्या जातात. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जित केल्यास जल प्रदूषण होते. त्यामुळे या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करावे, असे आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात येते. तसेच कृत्रिम तलाव घराच्या आसपासच्या परिसरात असल्यामुळे घरगुती गणेशमूर्ती विसर्जनासाठी सोयीचे ठरत आहे. त्यामुळे कृत्रिम तलावांमध्ये मूर्तींचे विसर्जन करण्याचे प्रमाणही वाढत आहे. करोना व टाळेबंदीच्या काळात कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन सक्तीचे करण्यात आले होते. त्यानंतर कृत्रिम तलावांची संख्या वाढत गेली.

यंदा गुगल मॅप्समध्ये कृत्रिम तलावांची यादी नोंदविण्यात येणार आहे. तसेच 'क्यू आर कोड'द्वारे भाविकांना कृत्रिम तलावांची माहिती मिळणार आहे. हा ह्यक्यू आर कोडह्ण गणेश मूर्तिकारांच्या मंडपा बाहेर दर्शनीय भागात लावण्यात येणार आहे. कृत्रिम तलावातील गणेशमूर्ती विसर्जनात ३७१ टक्क्यांनी वाढ झाली असून पालिकेने गणेशभक्तांनी पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती सुरू केली आहे.

# राज्यातील वैद्यकीय संशोधनाचे 'चक्र' गतिमान होणार

● नागपूर, (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकतर्फे लवकरच एक कंपनी स्थापन करून राज्यातील वैद्यकीय संशोधनाला गती देण्यासाठी 'चक्र' प्रकल्पावर काम सुरू केले जाणार आहे. १०० कोटींच्या या प्रकल्पाचे मुख्यालय नाशिकला असेल. सोबतच इतरत्र १० उपकेंद्र असतील.

या प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात ३० कोटी रुपये मिळतील. लवकरच मुंबईत वैद्यकीय सचिव, अधिष्ठात्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होईल, अशी माहिती महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांनी नागपुरात दिली.

प्रकल्पासाठी संचालकांची नियुक्ती केली जाणार आहे. या प्रकल्पावर आरोग्य विद्यापीठाचे नियंत्रण राहणार नाही. प्रकल्पाचे मुख्यालय नाशिकला असेल. पहिल्या टप्प्यातील पाच उपकेंद्र नागपूर, मुंबई, पुणे, औरंगाबाद, चंद्रपुरात असतील. दुसऱ्या टप्प्यात आणखी पाच उपकेंद्रांची त्यात भर पडेल. हे उपकेंद्र संबंधित जिल्हा, शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासोबत मिळून काम करतील. प्रत्येक केंद्रात एका विषयावर संशोधन होईल. त्यानुसार नागपुरातील केंद्रात आदिवासींमधील आजार, चंद्रपूरला कर्करोग, मुंबईतील जेजे महाविद्यालयातील केंद्रात डेटा सेंटरवर संशोधन, पुण्याच्या केंद्रात माता व बालकांवरील संशोधन होईल. या केंद्रात वैद्यकीय चाचण्यांसाठीही विशेष शाखा कार्यरत राहणार असल्याचेही डॉ. कानिटकर यांनी सांगितले. या संशोधनासाठी कंपनीला सामाजिक दायित्व निधी, शासनाकडून अनुदानासह इतरही अर्थसहाय्य उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे डॉ. संजीव चौधरी उपस्थित होते. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे महाराष्ट्रातील आरोग्यविज्ञान व वैद्यकीविषयक विद्यापीठ आहे. याचे मुख्यालय नाशिक येथे आहे. महाराष्ट्र शासनाच्या विशेष अधिकारानुसार "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नियम, १९९८ ला अनुसरून हे इ.स. १९९८ साली स्थापन झाले. महाराष्ट्र राज्यामध्ये येणारी सर्व वैद्यकीय व निमवैद्यकीय अभ्यासक्रम या विद्यापीठाच्या अखत्यारीत येतात. विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या शिक्षण, संशोधन, क्रीडा, प्रात्यक्षिक, कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम राबवले जातात. विद्यापीठाकडून आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरूनही नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवले जातात.



## एम्ससोबत सामंजस्य करार

■ नागपूर एम्ससोबतही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आदिवासींवरील संशोधनासाठी एक सामंजस्य करार करीत आहे. त्यामुळे एम्सही आदिवासींवरील आजाराशी संबंधित संशोधनात सहभागी होणार असल्याचे डॉ. कानिटकर यांनी सांगितले.

# तो लैंगिक विकृत आहे, अक्षय शिंदेच्या पहिल्या बायकोचा गंभीर आरोप



● बदलापूर, (प्रतिनिधी) :

बदलापूरमध्ये शाळकरी मुलींवर लैंगिक अत्याचार प्रकरणाचा पोलिसांकडून कसून तपास सुरू आहे. याप्रकरणाचा तपास करताना एसआयटीला आरोपीच्या पहिल्या पत्नीचा शोध लावण्यात यश आले आहे. अक्षय शिंदेची पहिली पत्नी पालघरमध्ये राहते. पोलिसांनी तिचा जबाब नोंदवून घेतला. तेव्हा तिने पोलिसांना अक्षय लैंगिक विकृत असल्याची माहिती दिली. अक्षय शिंदेच्या पहिल्या पत्नीने पोलिसांना सांगितले की, आरोपीच्या हिंसक लैंगिक वर्तनामुळेच तिने लग्नानंतर पाच दिवसांनी त्याला सोडले आणि परत सासरी गेली नाही. अक्षय क्रूर व्यक्ती आहे. आरोपीच्या वागणुकीवरून तो अशाप्रकारचे गुन्हे करू शकतो असा विश्वास तिने व्यक्त केला. अक्षयविरोधात कोर्टामध्ये साक्ष देण्यासाठी तयार असल्याचे तिने पोलिसांना सांगितले. आरोपी अक्षय शिंदेने तीन लग्न केले होते. त्याच्या दोन पत्नी लग्नानंतर १० दिवसांतच त्याला सोडून गेल्या होत्या. त्याच्यासोबत राहणारी तिसरी पत्नी गरोदर आहे. पण आरोपीने दावा केला की, त्याच्या पहिल्या दोन पत्नी चांगल्या स्वभावाच्या नव्हत्या. अक्षय शिंदेला याप्रकरणात कठोर शिक्षा होण्यासाठी त्याच्या पहिल्या पत्नीची साक्ष हा महत्वाचा पूरावा म्हणून काम करेल, असे पोलिसांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी धुळ्यातील सर्व ठाण्यांमध्ये आता पोलीस दादा, पोलीस दीदी

● धुळे, (प्रतिनिधी) :

देशासह राज्यात वाढत्या बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, धुळे जिल्हा पोलीस दल सतर्क झाले आहे. धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी जवळपास सर्वच शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांसह, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशी संवाद साधत आवश्यक उपाय योजना करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

त्यानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यात आता पोलीस दादा आणि पोलीस दीदी यांची नेमणूक करण्यात आली आहे.पोलीस महासंचालकांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार गेल्या आठवड्यात पोलिसांनी सर्व शाळांना भेटी दिल्या. मुलांच्या सुरक्षेविषयी संबंधित मुख्याध्यापक आणि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह संपूर्ण यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या. यात प्रामुख्याने सीसीटीव्ही बसविणे, तक्रार पेटी, संरक्षण भिंत, चारित्र्य पडताळणी विषयी गांभीर्य बाळगण्याची जाणीव यावेळी करून देण्यात आली. सर्व पोलीस ठाण्यात आता पोलीस दादा आणि पोलीस दीदी यांची नेमणूक करुन त्यांना अशासकीय संस्थेमार्फत (एनजीओ) प्रशिक्षण देण्यात आले आहे.



शाळकरी विद्यार्थ्यांच्या अवैध वाहतूकीवरही पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले असून काही ठिकाणी कारवाई केली. रिक्षाच्या क्षमतेपेक्षा अधिक संख्येने शालेय विद्यार्थ्यांना बसवून त्यांची वाहतूक करतांना पोलिसांनी अनेकांवर कारवाई केली. शाळेसमोर नाहक थांबणाऱ्या टवाळखोरांनाही आता पोलिसांनी लक्ष्य केले असून शाळांच्या आसपासच्या पानटपरी, दुकानांची तपासणी करण्यात आली. यावेळी प्रतिबंध असलेले पदार्थ जप्त करून कारवाई करणार असल्याचा इशारा देण्यात आला. शाळेसमोर वेगाने मोटारसायकल चालविणारे आणि खास करून कणकर्कश आवाज करणाऱ्या मोटारसायकल चालकांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे हे स्वतः वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये भेट देऊन सुरक्षेसंदर्भात तपासणी करणार आहेत. शाळा व्यवस्थापन, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी अधीक्षक धिवरे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात घेतलेल्या भूमिकेविषयी समाधान व्यक्त केले आहे.

# महापालिकेच्या दिव्याखाली अंधार !



● पुणे, (प्रतिनिधी) :

आवश्यक ते नियम पाळले नाही म्हणून इतरांवर कारवाईचा बडगा उगारणाऱ्या पुणे महापालिकेलाच कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. नियमांचे पालन न केल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) महापालिकेच्या दोन रुग्णालयांना नोटीस बजावली आहे. जैव वैद्यकीय कचऱ्या संदर्भात नियमांचे पालन न केल्याबद्दल ही नोटीस देण्यात आली आहे.

पुणे महापालिकेच्या मित्रमंडळ चौक, टिंबर मार्केट येथील हॉस्पिटलला या नोटीस देण्यात आली आहे. पालिकेची ही दोन हॉस्पिटल जैव वैद्यकीय कचरा याबाबत नियमांचे पालन करत नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही पावले उचलण्यात आली आहेत. या कारवाईमुळे शहरातील इतर संस्था, हॉस्पिटलवर कारवाई चा धाक दाखविणाऱ्या पालिका प्रशासनाच्या दिव्याखाली अंधार असल्याचे यानिमित्त समोर आले आहे. ही नोटीस दिल्यापासून एका महिन्याच्या आत एक वेगळे जैव वैद्यकीय कचऱ्या संदर्भात स्टोरेज सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना या नोटीसीतून देण्यात आल्या आहेत. एमपीसीबीचे प्रादेशिक अधिकारी जे.एस. साळुंखे यांनी ही नोटीस जारी केली आहे. यामुळे एक महिन्याच्या आत बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट नियम, २०१६ नुसार वेगळया जैव वैद्यकीय स्टोरेज सुविधा पुरवणे बंधनकारक आहे. याचा वार्षिक अहवाल तसेच सांडपाणी प्रक्रिया सुविधेचा तपशीलही एक महिन्याच्या आत सादर करण्याच्या देखील सूचना प्रदूषण मंडळाने महापालिकेच्या या दोन्ही हॉस्पिटलला दिलेल्या आहेत.

## काय म्हंटले आहे 'एमपीसीबी' ने

■ या दोन्ही हॉस्पिटलला 'एमपीसीबी' ने जैव वैद्यकीय स्टोरेजचे रेकॉर्ड राखून ठेवण्याला सांगितले आहे. तसेच बायोमेडिकल वेस्टचे वर्गवारीनुसार विलगीकरण करून त्याची विल्हेवाट लावेपर्यंत रंगीत कोडेड पिशव्यांमध्ये हा वैद्यकीय कचरा साठवून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सात दिवसांमध्ये कृती अहवाल सादर करण्यास सांगितले होते. मात्र याकडे देखील या दोन्ही हॉस्पिटलने दुर्लक्ष केल्याचे पुढे आले आहे.

# रस्त्यावर मुलीची छेड काढणाऱ्या रोड रोमियोला मायलेकींनी दिला चोप

● नाशिक, (प्रतिनिधी) :

कोलकाता आणि बदलापूर घटनेनंतर जनमानसात तीव्र संताप असताना, नाशिकमध्ये महिलांची छेड काढणाऱ्या चार रोडरोमियोंना मायलेकींनी भरस्त्यात चोप देत टवाळखोरांची चांगलीच मस्ती जिरवली. या घटनेचं सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्यानंतर नाशिककर या मायलेकींचं कौतुक करत आहेत. नाशिक शहरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. चोऱ्या, खून, मारामारी, सोनसाखळी चोऱ्या, यासह रोड रोमियोच्या त्रासानं नागरिक हैराण झाले आहे. अशात गुरुवारी (29 ऑगस्ट) दुपारच्या सुमारास नाशिकच्या पवननगर भागातील



एक महिला हेडगेवार चौकातील महानगरपालिकेच्या रुग्णालयात येत होती. त्यावेळी बाकावर बसलेल्या टवाळखोरांनी या महिलेची छेड काढली. सुरुवातीला महिलेनं याकडं दुर्लक्ष केलं.

मात्र, पुन्हा या टवाळखोरांनी छेड काढल्यानंतर तिचा संताप अनावर झाला. महिलेनं या टवाळखोरांना विचारणा केली. त्यावर त्यांनी उडवाउडवीची उत्तरं दिली. यादरम्यान महिलेची मुलगी आणि तिची मैत्रीणही दुचाकीवरून तिथं आली. आईची छेड काढल्याचं समजताच मुलीनं तेथील एका टवाळखोराच्या कानशिलात लगावली. तसंच त्यांनी बाजूनं जात असलेल्या भंगारच्या गाड्यावरून खुर्ची उचलत या टवाळखोरांना चांगलंच चोपून काढलं. या रणरागिनींचं रुप बघून टवाळखोर तिथून पळून गेले. हा सर्व प्रकार रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. महिलांनी दाखवलेल्या या धाडसाबद्दल त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असताना दुसरीकडं मात्र पोलिसांच्या अकार्यक्षमतेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

# जेएनपीएतील सरोवरात विविध प्रजातींच्या पक्ष्यांची मांदियाळी

● उरण, (प्रतिनिधी) :

समुद्र व निसर्गसंपन्न विभागात असलेल्या जेएनपीए बंदर परिसरातील आधुनिक इको तंत्रज्ञानाचा वापर करीत येथील पाचही जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. यामुळे जेएनपीए बंदर परिसराच्या सौंदर्यात भर पडली असून परिसरात येणाऱ्या विविध जातींच्या हजारो आकर्षक मुक्त पक्ष्यांचा संचारही वाढला आहे. निसर्गाने बहरलेल्या डोंगरदऱ्यात आणि मोकळया जागी अनेक जिवंत पाण्याचे झरे, पाणवठे, तलाव अस्तित्वात आहेत. या अस्तित्वात असलेल्या प्रशासन भवनसमोरील खालच्या बाजूला जुना शेवा गावाच्या पायथ्याशी, या गावातच असलेल्या शिवमंदिर आणि प्लाझा पार्किंगच्या शेजारी असे एकूण पाच नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, तलाव, विहिरी, नैसर्गिक झरे आहेत. या नैसर्गिक ठिकाणी वर्षातील सर्वच ऋतूंमध्ये ओलावा, पाणी कायम असल्याने विविध प्रकारचे पक्षी, सूक्ष्मजीव, जलजिवांची रेलचेल असते.



## विविध पक्ष्यांचा संचार

लाल मुनिया, चिमणी, सुगरण, गुलाबी पिंच, कालशिर्ष भारीट, पर्वत कलर, चिरक, दयाळ, छोटा सातभाई, नर्तक, कोतवाल, सुतार, बैरागी, शेंदरी विष्फुलिफ, जेरडीनचा क्लोरॉप्सिस, पिपिट, करडा धोबी, चेस्टनट पोटाचा नटहॅच, फुलटोच्या गप्पीदास, राखी वटवट्या, शिंपी, कस्तुर, टकाचोर, राखी खाटीक, छोटा हिरवा राघू, तांबट,तांबडा होला, हरतालिका, नीलकंठ, खंड्या, भारद्वाज, सीगल आदी पक्षी येत आहेत.

# साखरपुड्यानंतर मुलगी पळून गेली तर गुन्हा होऊच शकत नाही : हायकोर्ट



● मुंबई, (प्रतिनिधी) :

मुंबईतील एका तरुणीचे पुण्यातील तरुणासोबत लग्न ठरले होते. 1 मे 2022 रोजी दोघांचा थाटामाटात साखरपुडा पार पडला. मात्र, साखरपुड्यानंतर सदरील तरुणी आपल्या प्रियकरासोबत पळून गेली. त्यानंतर दोघांनी लग्न देखील केले. तक्रारीनुसार पोलिसांनी तरुणीसह तिच्या कुटुंबियांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. हा गुन्हा रद्द करण्यासाठी कुटुंबियांनी मुंबई हायकोर्टात धाव घेत याचिका दाखल केली. या याचिकेवर गुरुवारी (ता. 28) न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

कोर्टाने प्रथम दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतला. त्यानंतर निकाल देताना साखपुडा झाल्यानंतरही मुलगी तिच्या प्रियकरासोबत पळून गेली तर त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाऊ शकत नाही, अशी टिप्पणी केली.

तरुणी आणि तिच्या कुटुंबियांचा तक्रारदार आणि त्यांच्या नातेवाईकांना फसवण्याचा मुळीच हेतू नव्हता. आपल्या प्रेमाबाबत संबंधित तरुणी तिच्या आई-वडिलांना माहिती देऊ शकली नाही.



# महाविद्यालयातील मुलींच्या बाथरुममध्ये छुपा कॅमेरा, 300 मुलींचे तसले व्हिडीओ इंटरनेटवर लीक?

● आंध्र प्रदेश, (प्रतिनिधी) :

आंध्र प्रदेशातील एका इंजिनिअरिंग महाविद्यालयात छुप्या कॅमेऱ्याने हॉस्टेलमधील मुलींचे आक्षेपार्ह अवस्थेतील 300 व्हीडिओ चित्रीत करण्याचा आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. महाविद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये असणाऱ्या शौचालयात एक कॅमेरा लपवण्यात आला होता. या कॅमेऱ्याने तरुणींचे आक्षेपार्ह व्हीडिओ चित्रीत करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आंध्र प्रदेशातील गुडलावलेरु कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे ही घटना घडली. यानंतर विद्यार्थ्यांनी रात्रभर आंदोलन करुन महाविद्यालयाचा परिसर दणाणून सोडला.

प्राथमिक माहितीनुसार, मुलींच्या वसतीगृहातील एका शौचालयात हा छुपा कॅमेरा लावण्यात आला होता. ही बाब समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांनी तातडीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी गुडलावलेरु महाविद्यालयातील शेवटच्या वर्षाला शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याला ताब्यात घेतले आहे. पोलीस सध्या या सगळ्यांची कसून चौकशी करत आहेत. छुप्या कॅमेऱ्याने टिपण्यात आलेले हे व्हीडिओ शेवटच्या वर्षाला शिकत असलेल्या या तरुणाकडून इंटरनेटवर विकले जात होते, असेही समजते. गुरुवारी 29 ऑगस्टला हा छुपा कॅमेरा विद्यार्थ्यांना सापडला. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केले आहे. यानंतर आंध्र प्रदेश सरकारने तातडीने याप्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. पोलिसांनी ज्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्याला ताब्यात घेतले आहे, त्याची कसून चौकशी सुरु आहे. त्याचा मोबाईल आणि लॅपटॉप जप्त करण्यात आला असून त्यामधील डेटा तपासून पाहिला जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आम्हाला मुलींच्या हॉस्टेलमध्ये कोणताही छुपा कॅमेरा मिळाला नाही. आम्ही संशयित विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गाचे मोबाईल फोन, लॅपटॉप आणि त्यांच्याकडील साहित्याची तपासणी केली. आतापर्यंत त्यांच्याकडे कोणताही व्हीडिओ सापडलेल नाही. महाविद्यालयातील तरुणींना काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही, असे पोलीस अधिकाऱ्यांनी म्हटले.